




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०७५ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com





## दीर्घकाळाच्या नातेसंबंधाचे रुपांतर विवाहात झाले नाही

# म्हणजे बलात्काराचा गुन्हा नाही

### छत्रपती संभाजीनगर येथील वकिलाविरुद्ध दाखल केलेला बलात्काराचा खटला रद्द

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

दोन प्रौढांमधील सहमतीचे दीर्घकाळाचे नातेसंबंध विविहात रुपांतरित झाले नाहीत, तर त्याला बलात्काराचा गुन्हा मानला जाऊ शकत नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला. छत्रपती संभाजीनगर येथील वकिलाविरुद्ध दाखल केलेला बलात्काराचा खटला रद्द करताना न्यायालयाने हा निर्णय दिला. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले की, केवळ मतभेद किंवा निराशेमुळे दीर्घकाळाचे संबंध बलात्कारात रूपांतरित होऊ शकत नाहीत. न्यायालयाने अनेक अयशस्वी किंवा तुटलेल्या नातेसंबंधांना गुन्हेगारीचा रंग देणाऱ्या 'चिंताजनक प्रवृत्तीची' दखल घेतली आहे, असे खंडपीठाने म्हटले. बलात्काराचा गुन्हा, हा गंभीर प्रकारचा आहे. तो फक्त लैंगिक हिंसाचार, जबरदस्ती किंवा संमतीच्या अभावाने



झालेल्या लैंगिक छळावेळी दाखल केला पाहिजे. प्रत्येक कटू नात्याला बलात्काराच्या गुन्ह्यात रूपांतरित करणे केवळ गुन्ह्याचे गांभीर्यच कमी करत नाही तर आरोपीवर कलंक आणि गंभीर अन्याय देखील करते.

लग्नाच्या खोट्या आश्वासनाखाली वकिलावर एका महिलेचा वारंवार बलात्कार केल्याचा आरोप करणारा एफआयआर रद्द करण्यास नकार देणारा मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश न्यायालयाने रद्दबातल ठरवला. दोघांमधील संबंध स्वेच्छेने होते आणि तीन वर्षांपर्यंत टिकले होते आणि त्या काळात महिलेने कधीही जबरदस्ती किंवा संमतीचा अभाव असल्याचा आरोप केला नव्हता, असे न्यायालयाला आढळून आले.

खंडपीठाने म्हटले की, बलात्कार आणि संमतीचे लैंगिक संबंध यात स्पष्ट फरक आहे.

न्यायालयाने काळजीपूर्वक तपासले पाहिजे की, आरोपीला खरोखरच पीडितेशी लग्न करायचे होते की त्याने केवळ आपली वासना पूर्ण करण्यासाठी खोटे वचन दिले होते, असे खंडपीठाने म्हटले आहे.

वकिलाने मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्च २०२५ च्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने ऑगस्ट २०२४ मध्ये त्याच्याविरुद्ध दाखल एफआयआर रद्द करण्यास नकार दिला होता. छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल झालेल्या २०२४ च्या एफआयआरमधून हा खटला सुरू झाला. तक्रारदार, तिच्या पतीपासून वेगळी राहणारी विवाहित महिला, २०२२ मध्ये वकिलाला भेटली होती. कालांतराने, दोघे जवळ आले आणि शारीरिक संबंधात अडकले. तक्रारीनुसार, वकिलाने तिला लग्न करण्याचे आश्वासन दिले होते परंतु नंतर माघार घेतली.

## टी-२० विश्वचषक स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर; १० वर्षांनंतर मायदेशात



**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

टीम इंडियाचा धडाकेबाज फलंदाज रोहित शर्माच्या नेतृत्वात भारताने गत 2024 चा टी-20 विश्वचषक उंचावत जगभरातील क्रिकेट विश्वात आपला दबदबा कायम केला. क्रिकेटचाहत्यांची पंढरी असलेल्या भारतात निवडणुकांप्रमाणेच क्रिकेट स्पर्धांची उत्सुकता पाहायला मिळते. त्यामुळे, गतवर्षी चॅम्पियन ट्रॉफी जिंकल्यानंतर आता भारतीय संघाला आणि क्रिकेट चाहत्यांना आगामी टी-20 विश्वचषकाची उत्कंठा लागून राहिली आहे. विशेष म्हणजे यंदाचा टी-20 वर्ल्डकप भारतात होणार असून 7 फेब्रुवारीपासून टी-20 विश्वचषकाच्या 10 व्या पर्वाला सुरुवात होणार आहे. तर, भारत पाकिस्तान यांच्यातील पहिला सामना 15 फेब्रुवारी होत आहे. तर, अंतिम सामना 8 मार्च 2026 रोजी अहमदाबाद येथे होणार आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शहा तसेच रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि हरमनप्रीत कौर यांच्या उपस्थितीत टी-20 विश्वचषकाच्या वेळापत्रकाची घोषणा करण्यात आली. यंदाही विश्वचषक स्पर्धेत एकूण 20 संघांचा असणार समावेश असणार आहे.

**सामन्याचं वेळापत्रक**

७ फेब्रुवारी भारत विरुद्ध अमेरिका (मुंबई वानखेडे)
१५ फेब्रुवारी भारत विरुद्ध पाकिस्तान
१२ फेब्रुवारी भारत विरुद्ध नामिबिया (नवी दिल्ली)
१८ फेब्रुवारी भारत विरुद्ध नेदरलँड्स (अहमदाबाद)
टी-20 विश्वचषक स्पर्धेसाठी 4 ग्रुप
ग्रुप A- भारत, पाकिस्तान, अमेरिका, नामिबिया, नेदरलँड्स.
ग्रुप B - ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, झिम्बाब्वे, आयर्लंड, ओमान.
ग्रुप C- इंग्लंड, वेस्ट इंडिज, इटली, बांगलादेश, नेपाळ.
ग्रुप D - दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, अफगाणिस्तान, युएई, कॅनडा.

## थोडक्यात...

### एक ब्राह्मण त्याच्या मुलीचा विवाह माझ्या मुलाशी करत नाही

भोपाळ (समर्थ गांवकरी) : आरक्षणाच्या मुद्द्यावरून मध्य प्रदेशात एका वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्याने केलेल्या वादग्रस्त विधानामुळे मोठा गदारोळ निर्माण झाला आहे. अनुसूचित जाती-जमाती अधिकारी कर्मचारी संघाचे प्रदेशाध्यक्ष आणि वरिष्ठ IAS अधिकारी संतोष वर्मा यांच्या वक्तव्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला असून, त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यांच्यावर गुन्हा दाखल करून शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. आरक्षण आर्थिक निकषांवर आधारित असावे की नाही, या विषयावर बोलताना संतोष वर्मा यांनी हे आक्षेपार्ह विधान केले. त्यांनी म्हटले, 'जोपर्यंत एक ब्राह्मण त्याची मुलगी माझ्या मुलाला दान करत नाही किंवा माझ्या मुलाशी संबंध ठेवत नाही, तोपर्यंत आरक्षण सुरुच राहायला हवे.' वर्मा यांचे हे विधान लगेचच सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि त्यातून मोठी राजकीय व सामाजिक खळबळ उडाल्याचे दिसत आहे. संतोष वर्मा यांच्या वक्तव्याचा अखिल भारतीय ब्राह्मण समाजाने तीव्र शब्दांत निषेध केला आहे. समाजाचे प्रदेशाध्यक्ष पुष्पेंद्र मिश्रा यांनी या टिप्पणीला 'जातिवादी' ठरवले आहे. 'वर्मा यांनी ब्राह्मण कन्यांचा अपमान केला असून, अखिल भारतीय नागरी सेवा नियमांचे उल्लंघन केले आहे', असा आरोपही करण्यात आला आहे.

## लग्नानंतर नवरदेव कोसळला, हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**अमरावती : (समर्थ गांवकरी)**

लग्न म्हणजे आनंदाचा आणि पै पाहुण्यांसह एकत्र येत दोन कुटुंबाच्या मिलनाचा क्षण असतो. दोन मनांसह दोन कुटुंबांचीही जोडी लग्नात जुळते. प्रत्येकाच्या आयुष्यात लग्न हा कायम आठवणीत ठेवावा असा क्षण असतो, त्यामुळेच लग्नाचा उत्साह हा घरोघरी पाहायला मिळतो. मात्र, अनेकदा लग्नकार्यात, शुभ कार्यात विघ्न येतात अन् नको ते घडतं. अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातही अशीच दुर्दैवी आणि काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. लग्नाच्या दिवशीच अमोल गोड या तरुणाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. या घटनेनं आनंदी उत्सव सुरू असलेल्या लग्नमांडवात काही क्षणातच शोककळा पसरली. वरुड तालुक्यातील पुसला गावाचे कोतवाल अमोल गोड यांचा हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अमरावतीच्या



वरुड तालुक्यातील पुसला तलाठी कार्यालयातमध्ये कोतवाल म्हणून ते कार्यरत होते. विशेष म्हणजे आज त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा क्षण होता, दोनाचे चार हात होऊन त्यांचा संसार थाटला जाणार होता. मात्र, नियतीच्या मनात काहीतरी वेगळच होतं. शुभ मुहूर्तानुसार आज दुपारीच अमोल यांचा विवाह झाला. शुभ मंगल सावधान म्हणत सर्वांनी अमोल यांच्या वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छाही दिल्या. मात्र, लग्न सोहळ्याच्या अर्ध्या तासानंतरच अमोल यांस हृदयविकाराचा झटका आल्याने ते खाली कोसळले. त्यानंतर, त्यांना तात्काळ रुग्णालयातही दाखल करण्यात आले. मात्र, हृदयविकाराच्या झटक्यातच त्यांचा मृत्यू झाला होता.






# बीड जिल्हा युद्धभूमी झालीय

### कुणालाही जाती-धर्माच्या नावाखाली वाद करायचे असेल तर बीडमध्ये येतात; जयदत्त क्षीरसागरांची खंत

**बीड : : (समर्थ गांवकरी)**

गेल्या काही काळापासून बीड जिल्हा आणि त्या ठिकाणची गुन्हेगारी सातत्याने चर्चेत आहे. त्यावरुनच बीडची तुलना बिहारशी केली जाते. आता तशाच प्रकारची खंत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केली. बीड जिल्हा म्हणजे युद्धभूमी झाली आहे, कुणालाही जाती धर्माच्या नावावर युद्ध खेळायचं असेल तर ते बीडमध्ये येतात असं जयदत्त क्षीरसागर म्हणाले. तसेच बीडची अवस्था बिहारपेक्षाही वाईट झाल्याचं ते म्हणाले. नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारानिमित्त आयोजित सभेत जयदत्त क्षीरसागर यांनी ही खंत व्यक्त केली.

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत योगेश क्षीरसागर यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी प्रचारसभेत भाग घेतला. त्यावेळी त्यांनी बीडच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य केलं. सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन जाणं गरजेचं आहे. जन्म घेतल्यानंतर समाजाचं काही देणं लागतो अशा व्यापक विचारातून काम करायलं हवं असं जयदत्त क्षीरसागर म्हणाले.

यावेळी जयदत्त क्षीरसागर यांनी एक प्रसंग सांगितला. ते म्हणाले की, "मूळचे बीडचे असलेले आणि पाटण्याला राहत असलेले एक दाम्पत्य गंगा स्नान करण्यासाठी प्रयागराजमध्ये गेले. ते बोलत असताना चुकून कुठेतरी त्यांच्याकडून बीडचा उल्लेख करण्यात आला. ते ऐकून दहा बारा लोक त्यांच्या भोवती जमा झाले. तुम्ही बीडमधून आला का? असं त्यांनी हिंदीतून विचारलं. त्यावर ते दाम्पत्य म्हणाले की, आमचे मूळ बीडचे आहे, पण राहतो पाटण्यामध्ये. त्यावर ते लोक भडकले. बीडचे लोक वाईट आहेत, यांना इथून हाकलून द्या असं त्या लोकांनी म्हटलं. नंतर त्या दाम्पत्याची अक्षरशः धिंड काढण्यात आली. देशभरात आपली प्रतिमा एवढी वाईट झाली आहे. आता ही वाईट प्रतिमा धुऊन काढायची असेल तर त्याची सुरुवात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपासून केली पाहिजे."



**अजित पवारांवर टीका**

दरम्यान, सोमवारी सिद्धिविनायक संकुल येथे अजित पवारांची सभा पार पडली. या सभेत क्षीरसागर कुटुंबाने 35 वर्षात काय केलं? असा सवाल अजित पवारांनी उपस्थित केला होता. यावरही जयदत्त क्षीरसागर यांनी उत्तर दिलं. मी अद्याप भाजपात प्रवेश केला नाही. मात्र मला मदत करायची आहे असं वक्तव्य जयदत्त क्षीरसागर यांनी केलं.




# अधीक्षकांच्या अडचणी सोडविण्यासाठी संघटना उभारणार लढा

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

शासकीय आदिवासी आश्रम शाळा अधिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य.या संघटनेचे राज्यस्तरीय कार्यकारिणीची सभा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू सरदार यांच्या अध्यक्षतेखाली लायन्स क्लब नासिक येथे नुकतीच पार पडली.सदर सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली. आश्रम शाळेवरील अधीक्षक अधिक्षिका हे २४/७ तास निवासी राहून काम करतात त्याचे कामाचे तास निश्चित करणे, पदोन्नतीची टक्केवारी ७५ करणे,अधीक्षकांचा पदभार अधिक्षिकेकडे न सोपवता पूर्वीप्रमाणे सेवा जेष्ठशिक्षक यांचेकडे सोपावणे,आश्रमशाळा संहितेतील संधीग्धता दूर करणे,अधिक्षक संवर्गास अत्यावश्यक सेवेमध्ये समाविष्ट करणे,अधिक्षक अधिक्षिका यांना साप्तहिक व सार्वजनिक सुट्या देण्यास टाळाटाळ करतात त्या सुट्या देण्यात यावे इतर राज्य कर्मचाऱ्याप्रमाणे अधिक्षक अधिक्षिका यांना पाच दिवसाचा आठवडा करणे,अधीक्षक अधिक्षिका यांच्यावरील विनाचौकशी अन्याय कारक कारवाया थांबवणे. अशा प्रमुख प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी संघटनेने वेळोवेळी सनदशीर मार्गाने वरिष्ठ कार्यालयात निवेदने दिली आहेत. परंतु त्या निवेदनांची वेळीच दखल न घेतल्यामुळे संघटना आगामी काळात लढा उभारण्या च्या विचारात आहे.सध्या चर्चा करून या संदर्भातील मागण्यांचे निवेदन आयुक्त महोदय आदिवासीविकास महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले.या सभेला महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीचे धीरज पाटील,रवी थिटे,प्रवीण डेरे,योगेश चौधरी,अनंत म्हसतकर,चंद्रशेखर भारसागरे व संघटनेचे विभागीय अध्यक्ष माधव मोतेवाड,ठाणे, सुधीर सरोते,नागपूर. यशोधन वाघमारे नाशिक. व राज्यातील प्रकल्प अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक नाशिक विभागीय अध्यक्ष यशोधन वाघमारे यांनी केले तर आभार. प्रभाकर शिंदे यांनी मानले.सभेच्या आयोजनाकरिता चंद्रशेखर राठोड व नाशिक प्रकल्पतील सदस्य यांनी मेहनत घेतली.






नायगाव : नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या घुंगराळा ता.नायगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही खंडोबा देवाची यात्रा भरणार असून या यात्रेत कुस्ती स्पर्धा,कृषी व पशु प्रदर्शन या कार्यक्रमासोबत इतरही कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्ति भावाने साजरे होणार आहेत अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा गावचे उपसरपंच वसंत सुगावे पाटील यांनी दिली आहे. दिं. २६ नोव्हेंबर रोजी कुंटुर येथून खंडोबा देवाच्या पालखीचे दुपारी घुंगराळा येथे आगमन होईल त्यानंतर सायंकाळी खंडोबा मंदिरावर गावकऱ्यांच्या वतीने सामूहिक आंबील जेवणाचा कार्यक्रम होईल. त्यानंत दिं. २७ नोव्हेंबर रोजी घुंगराळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर दुपारी १ वा.कुस्ती स्पर्धा सुरू होतील सदर कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास जिल्ह्यातील विविध विभागाचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. तसेच दिं. २८ रोजी सकाळी १०.३० वा.भव्य कृषी व पशु प्रदर्शन हा कार्यक्रम होईल या कार्यक्रमास पंचक्रोशीतील शेतकरी, पशुपालक ,कृषी व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यासह यात्रेत विविध खाद्यपदार्थांचे दुकाने, खेळणीचे दुकाने,भांड्याचे दुकाने,कापड दुकाने आदी वस्तूंचे छोटी मोठी दुकाने मोठया प्रमाणावर लावण्यात येतात.

## थोडक्यात बातम्या...



### समाज कल्याण न्यासतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप व विद्यार्थ्यांचा सत्कार!

पालघर (स. गांवकरी) : डॉ. सोन्या दादा पाटील यांच्या समाज कल्याण न्यासतर्फे जिल्हाप्रमुख पालघर सौ. अंजली स. चौधरी यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषद शाळा अंभई येथे विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना डॉ. सोन्या दादा पाटील यांच्या समाजहितातील कार्याची तसेच समाज कल्याण न्यासाच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना भविष्यातील योग्य अभ्यास पद्धती, करिअर नियोजन आणि चांगल्या सवयींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमासाठी विशेष पुढाकार घेतल्याबद्दल समाज कल्याण न्यास पालघरच्या जिल्हाध्यक्ष सौ. अंजली स. चौधरी यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. संस्थेच्या सामाजिक कार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### पडघा येथे कॅनरा बँकेचे उद्‌घाटन; आधुनिक बँकिंग सेवांची हमी

भिवंडी (स. गांवकरी) : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे कॅनरा बँकेची नवी शाखा नुकतीच सुरू झाली. मुंबई सर्कल हेड रंजीव कुमार, ठाणे जिल्ह्याचे रिजनल हेड सुधांशू शाहू आणि पडघा शाखेचे मॅनेजर नेहल नागदेवे यांच्या हस्ते शाखेचे उद्‌घाटन करण्यात आले. कॅनरा बँकेची ही ठाणे जिल्ह्यातील ५५ वी शाखा असून, स्थानिक नागरिकांना सर्वोत्तम बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचा संकल्प असल्याचे मुख्य महाप्रबंधक रंजीव कुमार यांनी सांगितले. बँकेद्वारे विविध सरकारी योजना, कर्जसुविधा, डिजिटल बँकिंग, महिला व शेतकरी वर्गासाठी उपयुक्त सेवा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभाव्यात असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ग्राहकांना तत्पर आणि दर्जेदार सेवा देण्यासाठी अधिकारी व कर्मचारी सज्ज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. येणाऱ्या काळात पडघा परिसर वेगाने विकसित होत असून आर्थिक क्रियाशीलताही वाढत आहे. त्यामुळे कॅनरा बँकेची शाखा येथील विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास रंजीव कुमार यांनी व्यक्त केला. उद्‌घाटन प्रसंगी पडघा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रवींद्र विशे, श्रीकांत गायकर, गुरुनाथ जाधव, शैलेश बिडवी, पोलिस पाटील राजेश साळुंखे, अभिषेक नागेवकर यांच्यासह तालुक्यातील व्यापारी, उद्योजक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लिव्ह-इन संबंधातील वादातून तरूणीला धमक्या; रोजगार मेळाव्याची माहिती

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर-लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असलेल्या तरूण-तरूणीमध्ये झालेल्या वादातून तरूणीला शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी एका तरूणावर गुन्हा दाखल केला आहे. सदर घटना रविवारी (२३ नोव्हेंबर) मध्यरात्रीच्या सुमारास घडली. सावेडी उपनगरातील तपोवन रस्ता, कजबे वस्ती येथे राहत असलेल्या ३० वर्षीय पीडित तरूणीने रविवारी दुपारी फिर्याद दिली आहे. गणेश चितळे (पूर्ण नाव माहिती नाही, वारूळाचा मारूती, नालेगाव, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरूणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गणेश चितळे याच्यासोबत मागील तीन महिन्यांपासून लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. काही दिवसांपासून दोघांमध्ये वाद सुरू होता. त्यातूनच २३ नोव्हेंबरच्या मध्यरात्री गणेशने फिर्यादीला वारंवार फोन करून शिवीगाळ केली, तसेच मी तुला बघून घेईन अशा स्वरूपाची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. दरम्यान, पीडितेने घडलेला प्रकार तोफखाना पोलिसांना सांगितला. पोलिसांनी गणेश चितळे विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण करीत आहेत.

### गळफास घेवून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सोनई जवळील श्रीरामवाडी येथील शेतकरी राहुल जयराम निमसे (वय-३८) यांनी गेल्या रविवार दि. २३ रोजी खेडले परमानंद रस्त्यावरील शेतातील लिंबाच्या झाडाला दोराच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. शेतीत काही दिवसापासून उत्पन्न कमी होत असल्याने आत्महत्या केली असल्याची माहिती मिळाली.या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. नेवासा येथे शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आल्यानंतर सायंकाळी लांडेवाडी रस्त्यावरील अमरधामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# विकासकामांसाठी महायुती सरकार भक्कम : आमदार काशिनाथ दाते

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागाचा विकास झाला पाहिजे ही महायुती सरकारची संकल्पना राज्य सरकार राबवीत असून वर्षभरात मतदारसंघाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा विकास निधी उपलब्ध झाला असून येत्या सहा महिन्यांत या विकासकामांची प्रचिती प्रत्यक्षात पाहावयास मिळणार असून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत जनतेने भक्कमपणे महायुतीच्या मागे उभे राहण्याचे आवाहन आमदार काशिनाथ दाते सर यांनी केले आहे. देवीभोयरे येथील ४४ लाख रुपयांचा निधी विवीध विकासकामांसाठी देण्यात आला याचा भुमिपुजन शुभारंभ आमदार दाते सर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजपच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सोनाली सालके, सरपंच अशोकराव मुळे, अंबिका देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव, ज्येष्ठ नेते बाबुराव मुळे, माजी उपसरपंच विकासशेठ सावंत, सोनाबाई चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी आमदार दाते सर बोलत होते. यावेळी माजी सरपंच विठ्ठलराव सरडे, आदर्श शिक्षक विश्वनाथ गाजरे, मुळे ताई, गोपिचंद बेलोटे, कमलाकर बेलोटे, सत्यवान बेलोटे,विजय बेलोटे, शरद बोरुडे, शहाजी बेलोटे, अमोल गजरे, दिनेश गायकवाड, गणेश बेलोटे, अरविंद बेलोटे, बाबुराव बेलोटे, संजय बेलोटे, रामदास बेलोटे, जगन्नाथ बेलोटे, नरेंद्र बेलोटे,शिवाजी बेलोटे, तसेच महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार दाते सर म्हणाले देवीभोयरे गाव व परिसरातील विकासासाठी ४४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून तातडीने ही विकासकामे मार्गी लागणार आहेत. मतदारसंघाचा विकास करताना जनतेच्या सर्व प्रकारच्या सुवीधांचा विचार करून विकासकामे होणार आहेत. रस्ते, सभामंडप, लाईटचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न आदी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण सक्षम आहोत.राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आपणांस मोठ्या प्रमाणात पाठबळ आहे. माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील हे कार्यक्षम नेतृत्व असल्याने या भागाच्या विकासासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. जनतेने या नेत्वृत्वाला मोठे करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. माजी उपसरपंच विकासशेठ सावंत यावेळी म्हणाले गेली वर्षभरात आमदार दाते सर यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. देवीभोयरे गावचा विकास करण्यासाठी दाते सर यांनी लगेच ४४ लाख रुपयांचा विकास निधी दिला आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून विकास होत आहे. ही जनतेला खात्री असल्याने उद्याच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळणार असल्याची ग्वाही सावंत यांनी दिली आहे.



# मनपा निवडणूक, प्रारूप मतदार यादीत मोठा घोळ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महापालिका प्रशासनाने आगामी महापालिका निवडणुकीसाठी दि.२० नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी प्रकाशित केली आहे. मात्र यादीत मोठ्या प्रमाणात चुका, नावे वगळणे, चुकीची नोंदणी आणि प्रभाग बदल आढळत असून प्रशासनाचा निष्काळजीपणा व मनमानी स्पष्ट दिसून येते. सत्ताधाऱ्यांनी सोयीप्रमाणे प्रभाग रचना करून नागरिकांची दिशाभूल केल्याचा संशय अधिक बळकट झाला आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी दिली आहे. कळमकर यांनी सांगितले की, महानगरपालिका निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या सर्व संभाव्य उमेदवारांना विनंती ही मतदार यादी काळजीपूर्वक तपासा. आज हरकत घेतली नाही, तर उद्या स्वतःच्या प्रभागातच आपले हक्काचे मतदार नसण्याची शक्यता आहे. हरकती व आक्षेप नोंदविण्याची अंतिम तारीख: २७ नोव्हेंबर २०२५,निवडणुकीची पारदर्शकता राखणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, चुका दुरुस्त न केल्यास आम्ही त्यांना जबाबदार धरणार आहोत.

# श्री शिव छत्रपती महाविद्यालयाचा भारतीय सैन्यदलात चौकार

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**







जुन्नर येथील श्री शिव छत्रपती महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या एकूण चार कॅडेट्स ची भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. अशी माहिती एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाबासाहेब माने यांनी दिली. विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दल व इतर संरक्षण दलात निवड होण्यासाठी निरंतर प्रयत्नशील असलेल्या महाविद्यालयातील एनसीसी विभागाने यावर्षी देखील आपली परंपरा कायम राखली आहे.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास,त्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच वेग-वेगळ्या क्षेत्रात त्यांचे अस्तित्व निर्माण करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून एनसीसी विभागाने अनेक विद्यार्थी घडवले आहेत. सैन्य प्रशिक्षणा सोबतच अनेक समाज उपयोगी कार्ये देखील या विभागा मार्फत केले जातात.जसे की स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, नशामुक्ती, पर्यावरण जाणीव-जागृती,आपत्ती व्यवस्थापनासाठीचे मदत कार्य इत्यादी.यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाज सेवा,त्याग, सहयोग, साहस, निर्भयता इत्यादी मूल्यांचा विकास होण्यास मदत होते.याचाच परिणाम म्हणून या वर्षी एनसीसी विभागाच्या चार विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. कु.डोके आदेश रामदास, कु. गोपाळे विराज पोपट, कु. रसाळ संस्कृत गणेश, कु. ढोले यश जालिंदर [माजी एनसीसी कॅडेट] या विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात (अग्निवीर) मध्ये निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. संजय शिवाजीराव काळे व सर्व संचालक मंडळ यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. तसेच त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन भारत मातेची प्रामाणिक पणे सेवा करावी अशी भावना व्यक्त केली.या प्रसंगी अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. विलास कुलकर्णी, प्राचार्य डॉ. महादेव वाघमारे,उपप्राचार्य डॉ.रवींद्र चौधरी,एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाबासाहेब माने यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक करुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# निघोज आणी परिसरात पुर्णवेळ विजपुरवठा : आ. काशिनाथ दाते

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



निघोज आणी परिसरातील गावांसाठी लवकर पुर्णवेळ विजपुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली आहे. सध्या बिबट्याची भिती तसेच पारनेर तालुक्यातील बहुसंख्य गावामधील बागायत शेती असल्याने पाणी भरण्यासाठी किंवा शेतीचे ईतर कामे करण्यासाठी दिवसभर विजपुरवठा करण्यात यावा अशी मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे करण्यात आली होती. त्यासंदर्भात पुर्ण मतदारसंघात पुर्ण वेळ विजपुरवठा होण्यासाठी संबंधित सबस्टेशन मध्ये कोनती यंत्रणा गरजेची आहे त्याचा आढावा विज वितरण मंडळाने घेतला आहे. याबाबत पारनेरचे कार्यकारी अभियंता चव्हाण व उप कार्यकारी अभियंता गहांडुळे यांच्या बरोबर चर्चा झाली आहे. याबाबत निघोज सबस्टेशन मध्ये काही कामे अपूर्ण असून येत्या चार दोन दिवसांत ही कामे पुर्ण झाल्यानंतर निघोज आणी परिसरातील जवळपास वीस ते पंचवीस गावांमधील विजपुरवठा पुर्णवेळ सुरु राहणार आहे. मतदारसंघात मोठ्या प्रमाणात बिबट्यांची भिती आहे. यासाठी वनविभागाला सक्षम राहण्याची सुचना दिली आहे. तसेच याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या बरोबर चर्चा झाली आहे. बिबट्यांचा बंदोबस्त होणार आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वनविभागाकडून जवळपास 11 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला आहे. आवश्यक तेथे पिंजरे लावण्यात येणार आहे. वनविभागाचे कर्मचारी व अधिकारी वेळोवेळी दक्ष राहुन बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

# किनवटमध्ये गुरुवारी वंचित बहुजन आघाडीची सभा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी तर्फे गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी सायं. ५ वाजता दुर्गा मैदान, किनवट येथे एक जाहिर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेसाठी पक्षाचे नेते सुजात आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. नगराध्यक्ष पदासाठी वंचित बहुजन आघाडीतर्फे शाहेदा शेख शब्बीर या निवडणुक लढवत आहेत. तसेच प्रभागामध्ये पुढील उमेदवारांचा समावेश आहे : प्रभाग क्र. २ (ब) : मोहम्मद अली काहार खान, प्रभाग क्र. ४ (अ) : संगीता नामदेव कनिंदे, प्रभाग क्र. ६ (अ) : अरसलान अकबर खान प्रभाग क्र. १० (ब) : पुष्पलता माधवराव मुनेश्वर. सभेच्या आयोजनाची जबाबदारी कार्यकर्त्यांचा गट सांभाळत असून त्यात निखिल वाघमारे (ता.अध्यक्ष), सुरेश मुनेश्वर, प्रविण गायकवाड, दूधराम राठोड, दीनेश कांबळे, राहुल चौदंते, सुधकार हलवले, शेख याकुब आणि विशाल जोंधळे यांचा समावेश असल्याची माहिती दिली आहे.

# विज्ञानामुळे दळणवळण आणि तंत्रज्ञान वेगाने वाढले – विजय पवार

## सत्यनिकेतन संस्थांतर्गत गणित-विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार!

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी. विज्ञानामुळे समाजातील अनेक अंधश्रद्धा कमी होत असून तंत्रज्ञान व दळणवळणाचा वेगही विज्ञानामुळेच वाढला आहे, असे प्रतिपादन सत्यनिकेतन संस्थेचे जेष्ठ संचालक विजय पवार यांनी केले.

राजूर येथील सत्यनिकेतन संस्थांतर्गत गुरूवर्य रा.वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गणित-विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून विजय पवार बोलत होते. कार्यक्रमाला संचालक विलास पाबळकर, शिक्षण निरीक्षक लहानू पर्बत, प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख, खिरविरे विद्यालयाचे प्राचार्य मधुकर मोखरे, शेणित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक युवराज गभाले, सदाशीव गिरी, प्राचार्य भाऊसाहेब बनकर, उपप्राचार्य दीपक बुऱ्हाडे, पर्यवेक्षक गोरक्ष मालुंजकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे मार्गदर्शन करताना पवार म्हणाले की, आजचे युग हे विज्ञानयुग आहे. विज्ञानामुळे देशाची प्रगती वेगाने झाली असून नाविन्यपूर्ण कामामधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो. गणित आणि विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होतो, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात लहानू पर्बत, डॉ. बी. वाय. देशमुख, मधुकर मोखरे, सदाशीव गिरी, रविंद्र मढवई यांनीही आपले विचार व्यक्त केले.

या प्रदर्शनात सर्वोदय विद्या मंदिर राजूर, खिरविरे, कातळापूर, आश्रमशाळा शेणित आदी शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. इयत्ता ५ वी गटातून विज्ञानाचे ७ व गणिताचे ४, इयत्ता ६ वी ते ८ वी गटातून विज्ञानाचे ३४ व गणिताचे १३ तर इयत्ता ९ वी ते १२ वी गटातून विज्ञानाचे ५४ व गणिताचे ७ या प्रमाणे एकूण १२० प्रात्यक्षिक मॉडेल्स सादर करण्यात आली. जलशुद्धीकरण प्रकल्प, किशोरी कम पोल्ट्री प्रोजेक्ट, पवनचक्की, ज्वालामुखीचा उद्रेक, भूकंप सूचक यंत्र, गुरुत्वाकर्षण-विरोधी क्रेन, समांतर रेषा, त्रिकोण गुणधर्म अशी विविध मॉडेल्स विद्यार्थ्यांनी सादर केली.

धामणवन विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन वाकचौरे आणि चिंचवने विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास तेलोरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहीले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत उपप्राचार्य दीपक बुऱ्हाडे यांनी केले.

सूत्रसंचालन कविता वाळुंज यांनी केले तर प्राचार्य भाऊसाहेब बनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# अपंग संजीवनी नवजीवन कल्याणकारी संस्थेत महत्त्वपूर्ण बैठक

## दिव्यांग व निराधार घटकांच्या सशक्तीकरणासाठी एकजुटीचा संकल्प!

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अपंग संजीवनी नवजीवन कल्याणकारी संस्थेच्या कार्यालयात आज एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. सौं. वनिता काळुराम फडतरे यांनी संस्थेला भेट देत दिव्यांग व निराधार घटकांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा केली. दिव्यांगांना भेडसावणाऱ्या अडचणी, त्यांच्या हक्कांसाठी करावा लागणारा संघर्ष आणि आत्मनिर्भरतेकडे जाणारा मार्ग या सर्व विषयांवर मनमोकळा संवाद झाला. सौं. वनिता फडतरे




यांनी संस्थेच्या उपक्रमांना पूर्ण सहकार्याचे आश्वासन देत, विशेषत: दिव्यांग व निराधार महिलांच्या सशक्तीकरणासाठी पुढाकार घेण्याची तयारी दर्शवली. मागील 20 वर्षांपासून त्या सातत्याने समाजकार्य करत असून खालील पदांवर कार्यरत आहेत— सामाजिक न्याय बोर्ड समन्वयक – महाराष्ट्र राज्य. आदिवासी संरक्षण परिषद – महिला प्रदेशाध्यक्षा. धर्मवीर मानव सेवा संघ – महिला प्रदेशाध्यक्षा. राष्ट्रीय मराठा महासंघ – राज्य सचिव. या बैठकीत संस्थापक संचालक श्री. सुरेश दुधाने, संचालक श्री. संतोष गोळे आणि उपाध्यक्षा सौं. शोभा काळे उपस्थित होत्या. बैठकीदरम्यान संस्थापक श्री. सुरेश दुधाने यांनी सौं. वनिता फडतरे यांना अपंग संजीवनी प्रमुख सल्लागार समितीत सहभागी होण्यासाठी विशेष आमंत्रण दिले.

त्यांच्या अनुभवातून संस्थेच्या कार्याला नवी दिशा मिळेल, तसेच दिव्यांग आणि निराधार महिलांचे जीवन अधिक सक्षम आणि प्रेरणादायी होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली. सौं. शोभा काळे यांनी दिव्यांग व विधवा महिलांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढे येण्याचे आवाहन केले.



श्रीगोंदा तालुका : मास्टर स्ट्रोक युवा नवनीत अंतर्गत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात आयोजित चित्रकला स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. स्पर्धेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उल्लेखनीय कामगिरी बजावली.

## थोडक्यात बातम्या...



### दिपेश परदेशी आणि ॲड. तृप्ती परदेशी यांनाच मतदार विजयी करतील : डॉ. खोत

जुन्नर (स. गांवकरी) : जुन्नर नगरपरिषदेची निवडणूक अधिक रंगतदार होत असून प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात विविध उमेदवारांकडून मोठे शक्तीप्रदर्शन होत आहे. प्रभाग क्रमांक ८ मधील उच्च शिक्षित आणि माजी उपनगराध्यक्ष दिपेशसिंह परदेशी तसेच नगराध्यक्ष पदाच्या ॲड. तृप्ती परदेशी यांच्या प्रचारासाठी काढण्यात आलेल्या भव्य रॅलीला नागरिकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळाला. परदेशपूरा येथील कार्यालयाचे उद्घाटन भाजप नेत्या सौ. आशाताई बुचके यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी भाजपा पुणे जिल्हा उपाध्यक्ष संतोष नाना खैरे, माजी नगराध्यक्ष सतीश परदेशी, माजी नगरसेवक शामसिंग खोत, सुजित हजारी, जुन्नर तालुका राजपूत समाज संघटनेचे अध्यक्ष आंदसिंह परदेशी, भाजपा शहराध्यक्ष सचिन खत्री यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. उद्घाटनानंतर निघालेल्या प्रचार रॅलीनंतर माध्यमांशी बोलताना डॉ. लुकेश खोत म्हणाले, “प्रभाग क्रमांक ८ मधील उमेदवार दिपेशसिंह परदेशी आणि ॲड. तृप्ती वैभव परदेशी हे दोघेही उच्च शिक्षित असून जनता त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. कमळच्या चिन्हावर हे दोन्ही उमेदवार निश्चितपणे विजयी होतील,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रचार रॅलीतील उत्साह, नागरिकांची मोठी गर्दी आणि उमेदवारांना मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता परदेशी दाम्पत्याचे पारडे सध्या जड होताना दिसत आहे.

### ओंकार शुगर ग्रुपकडून कर्मचाऱ्यांना २० टक्के पगारवाढ

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : ओंकार शुगर ग्रुपने आपल्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी तब्बल २० टक्के पगारवाढ जाहीर केली आहे. ही माहिती ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांनी दिली. बोत्रेपाटील म्हणाले, “कर्मचारी ही ओंकार शुगर ग्रुपची खरी ताकद आहे. त्यांच्या परिश्रमामुळेच ओंकार ग्रुपने अल्पावधीत राज्यातील १८ साखर कारखान्यांचे पुनरुज्जीवन करून उत्पादन क्षमतेत मोठी वाढ साध्य केली आहे. ही वेतनवाढ त्यांच्या परिश्रमांचे व त्यागाचे मोल आहे.” ओंकार शुगर समूहात सध्या १६,५०० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. २० टक्के पगारवाढ लागू झाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यात वाढ होणार असून आगामी गाळप हंगामासाठी यामुळे मोठे प्रोत्साहन मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे. हंगामाच्या तोंडावर झालेल्या या निर्णयाचे कर्मचारीवर्गाकडून स्वागत करण्यात येत आहे.



### विजया जहागीरदार यांचे निधन

नांदेड (स. गांवकरी) : दै.पुण्यनगरीचे जिल्हा प्रतिनिधी कालिदास जहागीरदार यांच्या मातोश्री आणि भाग्यनगर मधील जेष्ठ रहिवासी श्रीमती विजयाबाई माणिकराव जहागीरदार- 84 यांचे मंगळवारी दुपारी 2.15 वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सायंकाळी 8.30 वाजता गोवर्धन घाट येथील शांती धाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुले महेश, कालिदास,मुलगी सौ प्राची गोसावी ,,जावई,2 सुना, नातवंडे ,5 भाऊ ,5 बहीणी असा मोठा परिवार आहे.

# “धनुष्यबाणावर शिक्का मारा, अभूतपूर्व विकास मी करून दाखवीन”

- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे
- मैने एक बार कॅमेट मेट करली तो मै आपनी आपकी भी नही सुनता - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे
- जामखेडच्या विकासाची हमी; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभेत घोषणा

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरात झालेल्या भव्य जाहीर सभेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जामखेडच्या सर्वांगीण विकासाची हमी दिली. “ही परिवर्तनाची लढाई आहे. मुख्यमंत्री असताना मी सुरू केलेली माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही,” असे




सांगत त्यांनी नागरिकांना विश्वास दिला. अहिल्याबाई होळकरांची जन्मभूमी असलेल्या जामखेडची “मक्तेदारी मोडण्याची वेळ आली आहे,” असेही ते म्हणाले.

धनुष्यबाण चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन करताना ते म्हणाले, “जात-पात न पाहता धनुष्यबाणावर शिक्का मारा. जामखेडकरांनी कधी न पाहिलेला विकास मी करून दाखवणार आहे. आरोप-प्रत्यारोपाच्या मागे मी जात नाही, पण विकास मात्र नक्की करून दाखवतो.”

शिंदे यांनी विविध योजनांचा उल्लेख करताना सांगितले की लाडकी बहीण योजना निर्बंध न लावता सुरूच राहील 70 हजारांहून अधिक रुग्णांना उपचारासाठी मदत देण्यात आली एस.टी. प्रवासात महिलांन साठी 50% सवलत लागू उच्चशिक्षित मुलींची फी माफ करण्याची तयारी डिपी प्लॅन, पाणीपुरवठा, गार्डन विकास यासह विविध विभागांचे काम वेगाने पूर्ण करण्यात येणार“ एकदा मी शब्द दिला की मग कोणाचं ऐकत नाही—तो शब्द पूर्ण करूनच दाखवतो,” असे सांगून त्यांनी सभेत उत्साह निर्माण केला.

“ही लढाई सत्तेची आहे; दोन तारखेला धनुष्यबाण चिन्हावर मतदान करून लाडकी बहीण उभी करा,” असे आवाहन त्यांनी केले.व्यापक उपस्थितीने सभा गजबजली या सभेला डॉ. खा. श्रीकांत शिंदे (खासदार, कल्याण लोकसभा), संजय शिरसाठ (मंत्री, सामाजिक न्याय व पालकमंत्री संभाजीनगर), खा. सदाशिव लोखंडे (शिर्डी लोकसभा), शिवसेना प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे, उपनेते राजू वाघमारे, बाबूशेठ टायरवाले, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष डॉ. शबनम इनामदार, तालुकाप्रमुख प्रा. कैलास माने, युवा नेते आकाश बाफना, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.पायलताई बाफना यांसह सर्व शिवसेना उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस भरती फॉर्मची अंतिम मुदत वाढवावी : अमोल बोरगे

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

पोलीस भरती परीक्षेसाठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची अंतिम मुदत 19 नोव्हेंबर 2025 ते 30 डिसेंबर 2025 पर्यंत वाढविण्यात यावी तसेच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता ही मुदत 31 डिसेंबर 2025 पर्यंत वाढवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोल किसन बोरगे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगर पंचायत, नगरपालिका तसेच जिल्हा पातळीवरील) निवडणुकांच्या अंमलबजावणीमुळे पोलिसांवर



मोठ्या प्रमाणात कामाचा ताण वाढला आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुलांना फॉर्म भरणे कठीण झाल्याचे बोरगे यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

## गणोरे येथील दोन तरुणांची भारतीय सैन्यदलात निवड

**अकोले तालुका (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील गणोरे येथील दोन होतकरू युवकांनी निर्णायक मेहनत व चिकाटीच्या जोरावर भारतीय सैन्यदलात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दिनेश अशोक पवार व गौरव भाऊसाहेब आंबरे या दोघांची भारतीय सैन्यदलात निवड झाली असून गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दोघांनी महाविद्यालयीन शिक्षणासोबत जुलै २०२५ मध्ये झालेली लेखी परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर १४ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या मैदानी चाचणीत उत्तम कामगिरी करत त्यांनी अंतिम निवड निश्चित केली. पवार व





आंबरे हे गणोरे गावातील देवी गल्ली येथील रहिवासी असून अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी हे यश मिळवले आहे.

त्यांच्या या कामगिरीबद्दल विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सभागृहात त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सोसायटीचे माजी अध्यक्ष अशोक आहेर, भगवान खातोडे, राजेंद्र आंबरे, सागर चव्हाण, गोरख आहेर, दत्तात्रय आंबरे, डॉ. सचिन दातीर, ग्रामपंचायत सदस्य पोपट आहेर, दत्तात्रय हांडे, बाळू शिंदे, मधू दातीर, देवराम आंबरे, सुभाष दातीर, सुभाष भालेराव, विवेक आहेर, निलेश आंबरे यांच्यासह सोसायटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी दोन्ही युवकांवर अभिनंदनाचा वर्षाव करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## जगात आई सारखे दुसरे दैवत नाही : हभप दयानंद महाराज कोरेगावकर

- कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे किर्तनाचा कार्यक्रम

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

आई वडील हे जगातील सर्वात मोठे तीर्थ असुन प्रत्येकानी मृत्यू नंतर आपली किर्ती ह्या जगात राहील असे जीवन जगले पाहिजे. जगात आई सारखे दुसरे दैवत नाही. आई वडिलांची सेवा करा ती परमेश्वर चरणी रुजू होते. देवाने कोट्यवधीचे शरीर दिले त्याची योग्य निगा राखणे हे आपले कर्तव्य असून भगवंताच्या नामात मोठी शक्ती असल्याने प्रत्येकाने भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे. जीवन हे संघर्षमय आहे, प्रत्येक गोष्टीसाठी आपणास संघर्ष



करावा लागत असतो. संघर्षमय जीवनात संतांचे विचार आपणास नेहमीच मार्गदर्शक ठरतात, असे प्रतिपादन किर्तनकार हभप दयानंद महाराज कोरेगावकर यांनी केले.

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे मंगळवार दि.२५ रोजी किर्तन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक संपतराव म्हस्के, बाळासाहेब साळुंके, दादासाहेब सोनमाळी, बापूसाहेब काळदाते, बाळासाहेब सपकाळ, प्रा.किरण पाटील, गुलाब तनपुरे, डॉ.विलास कवळे, डॉ.चंद्रकांत कोरडे, अशोक खेडकर, रघुआबा काळदाते, माजी सभापती मिनाक्षीताई साळुंके, पुजा सुर्यवंशी, अनिल पांडुळे, बाबासाहेब गांगर्डे, माजी उपसभापती प्रशांत बुद्धीवंत, संजय अनभुले, धनंजय मते, सचिन निंबोरे, संपत बावडकर, बापू साळवे, डॉ.राजेश तोरडमल, सुभाष सुर्यवंशी, हरी पांडुळे आदींसह डिकसळचे सरपंच जयसिंग थेटेपाटील, काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष सतिष थेटेपाटील, विलास थेटेपाटील तसेच परिसरातील ग्रामस्थांसह जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, जगात सर्वांना उपमा आहेत. मात्र, आई ही आईच. तिची ममता, करुणा, संस्कार यांसह विविध गुणांची बरोबरी कुणीच करू शकत नाही. ते घरातील जीवन लढा देणाऱ्या संस्काराचे विद्यापीठ आहे. जगात अनेक गर्भ श्रीमंत माणसे आहेत. मात्र, आई वडिलांचा सांभाळ न करणारे कमनशिबी आहेत. संत वचन हे नेहमी सत्य असतात. त्यांच्या ज्ञानाने परमेश्वर आणि मनुष्य यांच्यातील दुवा साधण्याचे काम संत करत असतात. संतांनी दाखविलेल्या सत्मार्गावर चालल्यास आपले जीवन धन्य होत असते. आई- वडीलांच्या प्रति कृतज्ञता म्हणजेच त्यांच पुण्यस्मरण साजरा करणे होय. त्यांचा विसर पडू न देता आपण आपले पुण्यफलातील कार्य अविरत केले पाहिजे. आई-वडीलांची सेवा करा. त्यांची सेवा करणाऱ्याला कुठेही जाण्याची गरज नाही.

### जाहीर नोटीस
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अकोले**
ता. अकोले जि. अहिल्यानगर
क्रं. कावि/आरटीएस/१२३९/२०२५ केस नं / २०२५ दि. २५/११/२०२५ यात
१. श्री. विनायक दगडु कोळगे
रा. हिवरगाव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर.......**अर्जदार**
**विरुध्द ......** १. अरुण नानासाहेब रुपवते
रा. हिवरगाव,ता. अकोले, जि. अहिल्यानगर.......**सामनेवाले**

या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्री. विनायक दगडु कोळगे रा. हिवरगाव, ता. अकोले यांनी मौजे हिवरगाव येथील स.न. १५६ वर रिकन्हेन्स दस्तानुसार श्री. अरुण नानासाहेब रुपवते यांचे नावा ऐवजी श्रीमती. नानीबाई नामदेव कोळगे यांचे नाव महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये दाखल होणेबाबत दि. १९/०५/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जाबाबत दिनांक १७/१२/२०२५ रोजी तहसिल कार्यालय अकोले येथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. आपणाकडे उपलब्ध कागदपत्रासह सदर दिनांकास आपण उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत आपले काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५/११/२०२५ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार अकोले तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी अकोले, जि. अहिल्यानगर**

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या ३१ विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड

## करिअर कट्टा व स्पर्धा परीक्षा केंद्राचा विद्यार्थ्यांना फायदा

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या तब्बल ३१ विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड झाली. अतिशय कठीण परिस्थितीत विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास करत व महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर सराव करत हे यश संपादन केले. सैन्यदलात निवड झालेले सर्व विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. घरची परिस्थिती सामान्य असूनही त्यांनी कठोर परिश्रम व जिद्दीच्या जोरावर सैन्यदलात भरती होण्याचे स्वप्न साकार केले.

भारतीय लष्कराने यावर्षी सैन्यदलामध्ये अग्निवीरसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. सदर भरती प्रक्रिया नुकतीच संपन्न होऊन त्यामध्ये बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या ३१ विद्यार्थांनी घवघवीत यश संपादन केले. संपूर्ण महाराष्ट्रात एका महाविद्यालयाच्या इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थी सैन्यदलात भरती होण्याचा हा उच्चांक आहे. ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शिक्षण मिळून त्यांनाही नोकरीच्या संधी मिळाव्यात ही दुरदृष्टी ठेऊन मा. आमदार स्व. बाबुजी आव्हाड यांनी महाविद्यालयाची स्थापना केली. आज हे महाविद्यालय उसतोडणी कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणाबरोबरच त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणारे गावपातळीवरील विद्यापीठ ठरत आहे.

गत १४ वर्षात महाविद्यालयाच्या ग्रंथालय, करिअर कट्टा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र तसेच भव्य अशा क्रीडांगणाचा व पुरविण्यात आलेल्या सोईसुविधांचा वापर करून २३४३ विद्यार्थी शासकीय सेवेत भरती झाले आहेत. दिवसभर अभ्यासिकेत अभ्यास करून महाविद्यालयाने पुरविलेल्या प्रश्नसंचांचा सराव करून व नंतर



क्रिडांगणावर शारीरिक चाचणीची तयारी करून विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे.

सैन्यदलात भरती झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, सैन्यदलात भरती व्हायचे असेल तर पूर्ण क्षमतेने अभ्यास व सराव करणे गरजेचे आहे. कोणत्याही अडचणीचे भांडवल न करता प्रामाणिकपणे सैन्यदल भरतीला सामोरे गेल्यास यश नक्की मिळते.

योग्य नियोजनाने ग्रामीण विद्यार्थीही स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊ शकतात तसेच बाबुजी आव्हाड महाविद्यालयाने यावर्षीही आपली उज्ज्वल परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांना सैन्यदलात भरती होण्यासाठी मार्गदर्शन केले.




**समशेरपूर विविध कार्यकारी सेवा सोसायटी समशेरपूर**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. विष्णू दराडे

**सावरगाव पाट विविध कार्यकारी सेवा सोसायटी सावरगाव पाट**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. प्रमोद नेहे

**देवठाण विविध कार्यकारी सेवा सोसायटी देवठाण,**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. शांताराम जोर्वेकर

**हिवरगांव विविध कार्यकारी सेवा सोसायटी हिवरगांव**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. अंबादास दातीर

**आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी सातेवाडी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. शिवाजी घुले

**आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी टाहाकारी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. शिवाजी सहाणे

**ब्राम्हणवाडा विविध कार्यकारी सेवा सोसायटी ब्राम्हणवाडा**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. अशोक हांडे

**आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी केळी सांगवी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. नवनाथ नेहे

**आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी एकदरे**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. शिवाजी सहाणे

**आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी आबितखिंड**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री.शिवाजी घुले

**आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी तिरडे**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री.नवनाथ नेहे

**डोंगरगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटी डोंगरगाव**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. बाळासाहेब मोरे

**बेलापुर विविध कार्यकारी सेवा सोसायटी बेलापुर**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. संजय फापाळे

**बदगी विविध कार्यकारी सेवा सोसायटी बदगी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. संजय फापाळे

**कळस बु. विविध कार्यकारी सेवा सोसायटी कळस बु.**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. नारायण चौधरी

**आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी पळसुंदे**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री.शिवाजी घुले

**आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी सांगवी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. नवनाथ नेहे

**पिंपळगाव निपाणी विविध कार्यकारी सेवा सोसायटी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. शिवाजी ढोले

**निंब्रळ विविध कार्यकारी सेवा सोसायटी निंब्रळ**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. सुरेश देशमुख

**वाशेरे विविध कार्यकारी सेवा सोसायटी वाशेरे**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. रावसाहेब नवले

**गर्दणी विविध कार्यकारी सेवा सोसायटी गर्दणी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. दिलीप थोरात

**पिंपळदरी विविध कार्यकारी सेवा सोसायटी पिंपळदरी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. गणेश रंधे

**परखतपूर विविध कार्यकारी सेवा सोसायटी परखतपूर**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. दिलीप थोरात

**उंचखडक बु. विविध कार्यकारी सेवा सोसायटी उंचखडक बु.**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. भाऊसाहेब देशमुख

**इंदोरी विविध कार्यकारी सेवा सोसायटी इंदोरी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. भाऊसाहेब देशमुख

**खिरविरे आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी खिरविरे**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव :श्री. शिवाजी सहाणे

**जाचकवाडी विविध कार्यकारी सेवा सोसायटी जाचकवाडी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. श्रीकृष्ण लांडे

**राजुर आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी राजुर**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. राजेंद्र धोंगडे

**शेंडी आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी शेंडी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. रामनाथ मेंगाळ

**धामणगाव पाट आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. सुरेश बेळे

**पिंपळगाव खांड विविध कार्यकारी सेवा सोसायटी पिंपळगाव खांड**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. सुरेश बेळे

**चैतन्यपुर विविध कार्यकारी सेवा सोसायटी चैतन्यपुर**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री.श्रीकृष्ण लांडे

**गणोरे विविध कार्यकारी सेवा सोसायटी गणोरे**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव
सचिव : श्री. विवेक आहेर

**सुगांव बु./ कुंभेफळ / रेडे विविध कार्यकारी सेवा सोसायटी,** ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव : श्री. कचरु विठ्ठल गोर्डे सा़ो.

**पिंपरकरणे / लाडगांव आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटी,** ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन / व्हा. चेअरमन / सचिव : श्री. विश्वास काळे

**जाहिरात सौजन्य : अकोले तालुका केडर नियुक्त सचिव संघटना**
**** विना सहकार, नही उध्दार !!**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# उपनगराध्यक्षपदी सुप्रिया सुभाष शिंदे यांची बिनविरोध निवड

## पारनेर नगरपंचायतमध्ये महिलाराज : महायुतीच्या ६ नगरसेवकांची निवडीला दांडी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष पदी सुप्रिया सुभाष शिंदे यांची बिनविरोध निवड झाली असून या निवडीला महायुतीच्या ६ नगरसेवकांनी या उपनगराध्यक्ष निवडीला दांडी मारली होती.तर नगराध्यक्ष पदी डॉ विद्या कावरे तर उपनगराध्यक्ष पदी सुप्रिया शिंदे यांची निवड झाल्याने पारनेर नगरपंचायत मध्ये महिलाराज आले आहे. पारनेर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष जायदा शेख यांनी



१७ नोव्हेंबर रोजी नगराध्यक्षा डॉ विद्या बाळासाहेब कावरे यांच्या कडे राजीनामा दिला होता त्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर उपनगराध्यक्ष पदासाठी सोमवारी एकमेव सुप्रिया सुभाष शिंदे यांचा अर्ज दाखल असल्याने प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर व साह्य अधिकारी सीईओ प्रियंका शिंदे यांनी बिनविरोध निवड जाहीर केली.

यावेळी दिपक लंके जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर डॉ बाळासाहेब कावरे सभापती योगेश मते माजी नगराध्यक्ष नितीन आडसुळ सभापती सौ सुरेखा भालेकर सभापती प्रियंका औटी नगरसेवक भुषण शेलार माजी उपनगराध्यक्ष जायदा शेख सचिन औटी विजय भास्कर औटी नगरसेविका हिमानी नगरे नगरसेविका विद्या गंधाडे कारभारी पोटघन बाळासाहेब नगरे राजु शेख ऋषीकेश गंधाडे चंदु कावरे सखाराम बुगे स्विकृत नगरसेवक मंगेश औटी राष्ट्रवादी शहराध्यक्ष बंडु गायकवाड शहराध्यक्ष अमित जाधव रामदास कावरे दगडु कावरे सिताराम बुगे बाळासाहेब भुसारे मोहन कावरे रावसाहेब कावरे नवनाथ बुगे विजय बूगे संदिप थोरात कोंडिभाऊ थोरात दिपक नाईक उपस्थित होते. उपनगराध्यक्ष निवडीला राष्ट्रवादी काँग्रेस पारनेर आघाडी व्हिप गटनेता योगेश मते यांनी माजी नगराध्यक्ष विजय औटी यांच्या सह १० नगरसेवकांना बजावला होता.




कंधार : कंधार नगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी मंगळवारी, दि.2 डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने कंधार नगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीची मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मतदान केंद्रावरील केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचे सोमवारी, दि.24 नोव्हेंबर रोजी दोन सत्रात दुसरे प्रशिक्षण पार पडले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी रामेश्वर गोरे यांनी 170 मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी, 14 क्षेत्रिय अधिकारी, 8 मास्टर्स ट्रेनर्स यांना ईव्हीएम हँड्स-ऑन प्रशिक्षण दिले. याप्रसंगी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संदिप भोळे व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रेखा चामणर यांनी सुध्दा मार्गदर्शन केले.

## थोडक्यात बातम्या...



### तामसा येथील राम मंदिरात महाआरतीला राम भक्तांची गर्दी

तामसा (स. गांवकरी) : तामसा येथील राम मंदिरात अयोध्येतील राम मंदिरावर ध्वजारोहणाच्या औचित्याने घेण्यात आलेल्या महाआरतीला प्रतिसाद मिळाला असून रामभक्तांनी आरती व दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. यानिमित्त सुमनबाई निलावार यांच्या हस्ते मंदिर परिसरातील नव्या भरवण्यात आलेल्या ध्वजाचे पूजन करून अनावरण झाले. मंदिरातील श्रीराम सीता लक्ष्मण यांच्या मूर्तीची सामूहिक आरती झाली. मंदिर परिसर जयश्रीरामच्या घोषणांनी दणाणून गेला होता. यावेळी बालाजी मंदिराचे विश्वस्त स्वप्निल बंडेवार यांनी अयोध्येतील मंदिरावरील ध्वजाची माहिती सांगितली.यावेळी मंदिराचे पुजारी अमोल तामसेकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर ज्येष्ठ व्यापारी दीपक बंडेवार,शशिकांत बंडावार, सचिन तांदळे,बाजार समितीचे माजी उपसभापती विशाल परभणकर,भाजप शहराध्यक्ष शिवराज वारकड, दीपक देशमुख, भाजप पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती,अर्जुन जोशी, गजानन लाभसेटवार, डॉ. दीपक नाईक,गणेश शिंदे, किरण वारकड,अमोल वाळकीकर,आशिष बीजमवार यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### किनवटमध्ये गुरुवारी वंचित बहुजन आघाडीची सभा

किनवट (स. गांवकरी) : नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी तर्फे गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी सायं. ५ वाजता दुर्गा मैदान, किनवट येथे एक जाहिर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेसाठी पक्षाचे नेते सुजात आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. नगराध्यक्ष पदासाठी वंचित बहुजन आघाडीतर्फे शाहेदा शेख शब्बीर या निवडणुक लढवत आहेत. तसेच प्रभागामध्ये पुढील उमेदवारांचा समावेश आहे : प्रभाग क्र. २ (ब) : मोहम्मद अली काहार खान, प्रभाग क्र. ४ (अ) : संगीता नामदेव कनिंदे, प्रभाग क्र. ६ (अ) : अरसलान अकबर खान प्रभाग क्र. १० (ब) : पुष्पलता माधवराव मुनेश्वर. सभेच्या आयोजनाची जबाबदारी कार्यकर्त्यांचा गट सांभाळत असून त्यात निखिल वाघमारे (ता.अध्यक्ष), सुरेश मुनेश्वर, प्रविण गायकवाड, दूधराम राठोड, दीनेश कांबळे, राहुल चौदंते, सुधकार हलवले, शेख याकुब आणि विशाल जोंधळे यांचा समावेश असल्याची माहिती दिली आहे. शहरातील काही रस्त्यांवर वंचित बहुजन आघाडीचे बॅनर्स आणि झेंडे लावण्यात आल्याचे दिसून येत आहे. सभेसाठी नागरिक उपस्थित राहतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली असली तरी निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेचे पालन होण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक देखरेख ठेवली जात आहे. या सभेनंतर निवडणुकीचा पुढील प्रचार आणि नागरिकांचा सहभाग यावर स्थानिक पातळीवरील चर्चा वाढण्याची शक्यता असल्याचे निरीक्षण व्यक्त केले जात आहे.

### लोकप्रतिनिधीने प्रामाणिक राहून काम करण्याची गरज : हेमंत पाटील

नवीन नांदेड (स. गांवकरी) : आजच्या काळात प्रामाणिक लोक प्रतिनिधीची गरज असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे आ हेमंत पाटील यांनी नांदेड दक्षिण तालुका प्रमुख उद्धव पाटील शिंदे यांच्या धनेगाव येथील जनसंपर्क पक्ष कार्यालय उदघाटन प्रसंगी आ.हेमंत पाटील यांनी केले यावेळी नांदेड दक्षिण विधानसभा मतदरसंघाचे आ आनंद बोंढारकर हे विजयी होऊन एक वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन शिवसेना शिंदे गटाचे उपनेते आ.हेमंत पाटील व आ.आनंद पाटील बोढारकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी प्रारंभी महापुरुषांचा प्रतिमेचे पूजन करण्यात आले, यावेळी महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख सौ. अनुराधा शिंदे,दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, अशोक मोरे, बाळू पाटिल मोरे, तुलजेश यादव, सुहास पाटील खराणे, रावसाहेब महाराज, मनोहर कदम, शिवाजी कदम, बालाजी भायेगावकर , बालाजी सपुरे पाटील, यांच्यासह असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ संघाचे आमदार आनंदराव पाटील बोढारकर यांना एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी परिसरातील युवकांच्या शिवसेना पक्षात उपनेते आ.हेमंत पाटील यांच्या हस्ते पक्षप्रवेश देण्यात आला.

### नो डोनेशन/नो फी अभियान राबवून विद्यार्थ्यांना शिक्षण मिळवून देणार

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा शहरातील खाजगी शाळा एका बाजूस शासनाच्या कडून अनुदान घेतात आणि दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांच्या कडून डोनेशन घेतात तसेच फी देखील घेतात त्यांना मिळणाऱ्या सवलती विदयार्थ्यांना देत नाहीत त्यामुळे दिवा शहरातील शासकीय अनुदान घेणाऱ्या खाजगी शाळांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. अनुदान घेणाऱ्या शाळांचे ऑडिट कधी केले याची सविस्तर माहिती घेऊन ऑडिट केले नसल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी.

# श्री अय्यापा स्वामी दीक्षा कालावधी प्रारंभ



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

श्री अय्यप्पा स्वामींच्या दीक्षा कालावधीला आजपासून विधिवत प्रारंभ झाला असून मार्गशीर्ष मास ते मकर संक्रांती या काळात केली जाणारी ही साधना अत्यंत कठोर व शिस्तपालनाची मानली जाते. या ४१ दिवसांच्या कालावधीत भाविक वैराग्य, ब्रह्मचर्य आणि संन्यास या तिन्ही आयुधांचे काटेकोर पालन करतात. दीक्षा धारण केलेल्या प्रत्येक स्वामीला या काळात पूर्ण संयम, शुचिर्भूत आचार आणि भक्तिभाव यांचे पालन बंधनकारक असते. दीक्षेच्या काळात पहाटेच्या थंडीत थंड पाण्याने अंघोळ, त्यानंतर पूजापाठ, जमिनीवर झोपणे, एकवेळचे भोजन, तसेच शारीरिक–मानसिक शुचिता राखणे अशा नियमांचे पालन करावे लागते. दिनचर्या पवित्र राहावी यासाठी शौचालय वापरल्यानंतर, जेवणापूर्वी, पूजेपूर्वी अशा विविध प्रसंगी दिवसातून चार ते पाच वेळा अंघोळ करणे अनिवार्य असते. त्यामुळे हा कालावधी अत्यंत कठीण आणि तपश्चर्येसमान मानला जातो.

दीक्षा घेणाऱ्या भाविकांसाठी ४१ दिवसांचा मंडळ कालावधी अत्यावश्यक असून, पहिल्यांदा दीक्षा घेतलेल्या स्वामींनी शबरीमाला येथे प्रत्यक्ष जाऊन भगवान अय्यप्पांचे दर्शन घेणे आवश्यक मानले जाते. दरवर्षीप्रमाणे ७ जानेवारी रोजी पंचक्रोशीतील गावांचा सहभाग असलेला महाप्रसाद भंडारा किनवट येथील श्री अय्यप्पा मंदिरात आयोजित करण्यात येणार असून, यामधून शबरीमाला यात्रेकरूंना पारंपरिक पद्धतीने रवाना केले जाते.

किनवट शहरातील श्री अय्यप्पा स्वामी मंदिर, श्री नर्मदेश्वर मंदिर, श्री गजानन महाराज मंदिर, श्री ब्रह्मगारू गायत्री व विश्वकर्मा मंदिर या प्रमुख ठिकाणांवर पवार गुरु स्वामी , विलास गुरु स्वामी, सातूरवार गुरु स्वामी, जलगमवार गुरु स्वामी, देवराव गुरु स्वामी, गोनेवार गुरुस्वामी, चंद्रशेखर नेम्मानिवार यांच्या पुढाकाराने तसेच तालुक्यातील विविध गावांमध्ये अय्यप्पा स्वामी भक्त वास्तव्यास असून त्यांच्याद्वारे नित्य साधना सुरू केली आहे. तर यावेळी दानशूर व्यक्तीकडून मोठ्या प्रमाणात सढळ हाताने अन्नदान केले जाते.

दररोज मोठ्या प्रमाणात भजन करत भगवंताची पूजा अर्चा केली जाते तर प्रत्येक बुधवारी पहाटे पडी पूजेचे आयोजन करण्यात येते ज्यामध्ये पंचमेवा, मध, दूध दही तुपासह विविध फळांचे नैवेद्य व अभिषेक करण्यात येतो.

तर काही भाविक या दरम्यानच्या काळात आपल्या घरी मोठ्या प्रमाणात पडी पूजेचे आयोजन करतात. ज्या करिता केरळ राज्यातील नंबुद्री ब्राह्मण गुरु उपस्थित राहतात तर परिसरातील 4 ते 5 हजार भाविक उपस्थित राहतात.

या यात्रेचा मुख्य हेतू म्हणजे मकर संक्रांती निमित्त प्रगट होणाऱ्या दिव्य 'मकर ज्योती' चे दर्शन, जे प्रत्येक अय्यप्पा भक्तासाठी अत्यंत पवित्र आणि आयुष्यभरातील स्मरणीय अनुभव मानला जातो. अय्यप्पा स्वामी दीक्षेच्या प्रारंभाने संपूर्ण परिसर भक्तिभावाने भारून गेला असून, पुढील काही दिवसांत विविध उपक्रम, पूजा-अर्चा व आध्यात्मिक कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती स्थानिक मंडळांनी दिली आहे.

# २६ नोव्हेंबरला उमेदवारांना चिन्ह वाटपाची प्रक्रिया

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक–२०२५ च्या टप्पेनिहाय कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु झाली आहे. या कार्यक्रमातील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून येत्या बुधवारी, दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी निवडणूक लढविणाऱ्या सर्व वैध उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. नगर परिषद निवडणुकीसाठी नामांकन पत्रांची छाननी पूर्ण होऊन वैध उमेदवारांची यादी निश्चित झाली आहे. त्यानंतरच्या प्रक्रियेनुसार प्रत्येक प्रभागात अध्यक्ष व सदस्य पदासाठी उभे असलेल्या उमेदवारांना त्यांचे अधिकृत निवडणूक चिन्ह देण्यात येणार आहे. सकाळी ११.०० वाजल्यापासून ही कार्यवाही नगर परिषद कार्यालयात पार पडणार आहे. तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांनी जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, सर्व उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित राहणे गरजेचे आहे. चिन्हवाटपाची प्रक्रिया प्रभागनिहाय आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार असून, यानंतर प्रत्येक उमेदवाराला त्यांच्या प्रचाराची दिशा अधिकृतरीत्या ठरलेले निवडणूक चिन्ह मिळणार आहे.

# विविध अपघातात ५ जखमी; जगद्गुरु नरेंद्रचार्य रुग्णवाहिकेची सेवा ठरते वरदान

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

अपघाताच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून अपघातात मृत्यूंचाही आकडा वाढत आहे. सोमवारी दोन तर मंगळवारी दोन अपघात झाले असून या अपघातात पाच जण जखमी झाले आहेत.

गत काही दिवसापासून अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अपघाताचे प्रमाण कमी व्हावे यासाठी प्रशासनाकडून नियोजनाच्या अभाव दिसून येत आहे. दि.२४ सोमवार रोजी सायंकाळी चार वाजता दुचाकी समोर कुत्रा आल्याने गाडी स्लिप होऊन विश्वनाथ उत्तमराव पवार वय ३२ वर्षे रा. निवघा ता. मुदखेड हे जखमी झाले आहेत. तर सोमवारीच सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास नांदेड-हिंगोली रोडवर तामसा पाटीजवळ पाठीमागून येणाऱ्या कारची दुचाकी धडक बसली यात शेख जमीर शेख रजाक वय ४२ वर्ष रा. वसमत जिल्हा हिंगोली हे जखमी झाले आहेत.



दि.२५ नोव्हेंबर मंगळवार रोजी सकाळी भोकर नांदेड रोडवर येळेगाव पाटी जवळ एका पंपा समोर कार समोर वन्य प्राणी आल्याने प्राण्याच्या बचाव करताना कारवरील ताबा सुटला अपघात झाला यावेळी नितीन गोपाळराव नाईकवाडे वय ते ३० वर्षे रा. मालेगाव ता.अर्धापूर हे जखमी झाले आहेत. तर दि.२५ मंगळवारीच नांदेड- अर्धापूर रोडवर खडकुत पाटी जवळ अचानक दुचाकीसमोर कुत्रा आल्याने गाडी स्लिप झाली. अनुसयाबाई हनुमंत गुंडे वय ५५ वर्षे रा. गुंडेवाडी ता. लोहा , शंकर गणपती सूर्यवंशी वय ४० वर्षे रा. बारड ता. मुदखेड हे जखमी झाले आहेत. वरील अपघातात काहींची प्रकृती चिंताजनक आहे तर काही गंभीर जखमी आहेत. सदर चारही अपघाताची माहिती मिळता क्षणी जगद्गुरु नरेंद्रचार्य संस्थान नाणिजधाम रुग्णवाहिका चालक राजू पाचंगे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल केले.

# काँग्रेस पदाधिकाऱ्यांची जिल्हा कार्यकारणीवर निवड

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि नांदेड जिल्ह्यातील कार्यकारिणीला नवे गतिमान नेतृत्व मिळावे या उद्देशाने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिनांक 24 नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष राजेश पावडे यांना पत्र पाठवून नांदेड उत्तर जंबो कार्यकारिणी जाहीर केली. या नव्या कार्यकारिणीत किनवट तालुक्यातील तीन महत्वाच्या काँग्रेस पदाधिकाऱ्यांना प्रमुख जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून



किनवट तालुक्याच्या राजकीय वर्तुळात या नियुक्त्यांची विशेष चर्चा सुरू आहे. तीन पदाधिकाऱ्यांना जिल्ह्यात मानाचे स्थान या कार्यकारिणीत माजी नगराध्यक्ष के. मूर्ती यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे. किनवट नगरपरिषदेचे माजी प्रथम नागरिक म्हणून त्यांनी केलेल्या कामाचा आणि दीर्घ राजकीय अनुभवाचा विचार करून ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काँग्रेसच्या धडाडीच्या कार्यकर्त्या नंदिनी टारपे यांचीही जिल्हा उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी काँग्रेसमध्ये विविध पदांवर काम करताना केलेले संघटनबळ वाढवण्याचे कार्य, महिलांना राजकारणात सक्रिय करण्यासाठी घेतलेले पुढाकार आणि ग्रामीण भागातील जनसमस्या घेऊन केलेला संघर्ष याची दखल पक्षाने घेतली आहे. सिराज जिवानी या निष्ठावान व जुन्या काँग्रेस कार्यकत्याची जिल्हा सरचिटणीस पदी निवड झाली असून त्यांच्या संघटन कौशल्यामुळे आणि पक्षनिष्ठेमुळे जिल्हा पातळीवर काँग्रेसची ताकद वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# आर. एल. पी. हायस्कुलमध्ये लसीकरण मोहीम संपन्न

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

शालेय विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी तसेच शरीर आणि मन सुदृढ राहण्यासाठी मुलांचे वेळोवेळी लसीकरण करणे तितकेच महत्त्वाचे असते. दि. २५ नोव्हेंबर रोजी दिवा शहरातील मुंब्रादेवी कॉलोनी येथील आर. एल. पी. हायस्कूल मध्ये टेटन्स वॅक्सीन कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. दहा ते बारा वर्ष वयोगटातील शालेय मुलांना तसेच सोळा वर्ष वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांना ही लस देण्यात आली. शाळेतील शंभर पेक्षा अधिक विदयार्थ्यांना लस देण्यात आली. सदर लसीकरण मोहिमेला पालकांचाही पाठिंबा होता तसेच ही लस का घ्यावी याबद्दल पालकांना व मुलांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले. प्रसंगी शाळेचे विश्वस्त राजेश पांडे सर, प्रमोद सर, संतोष सर, मनोज सर तसेच मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभागी होत विध्यार्थ्यांची व पालकांची गैरसोय होऊ नये म्हणून विशेष सहकार्य केले आहे.

# नावा मनपाच्या प्रभाग २० मधील मतदार प्रभाग क्रमांक १९ मध्ये समावेश

## दुरूस्ती करण्याची मागणी

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

मतदार - नांदेड वाघाळा महानगर पालिकेने आगामी सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक साठी वार्ड निहाय मतदार यादी अद्यावत करण्यात आली आहे ,या निवडणुकीची प्रभागरचना करताना प्रभाग 20 मधील बुथ क्रमांक 232 असदवन येथील भागाचा समावेश प्रभाग 19 कौठा या मतदार यादीत आल्याने मनपाच्या इच्छूक उमेदवारांनी यावर आक्षेप घेतला आहे असुन ह्या मतदार अद्यावत करा अशी मागणी आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे मनपा यांच्या केली आहे.




नांदेड वाघाळा महानगर पालिकेची सार्वत्रिक निवडणुकीची प्रभाग रचना आरक्षण यासह मतदान याद्या अध्यावत करण्याचे काम मनपाच्या निवडणुक विभागाकडुन होत आहेत यात विस प्रभागाची रचना करण्यात आली असून सिडको हडको यासह वाघाळा असदवन या भागाचा यात समावेश करण्यात आला असून सर्वात मोठा प्रभाग झाला आहे. तर प्रभाग 19ची करतांना कौठा,वसरणी,

असर्जन,धुमाळवाडी यासह अनेक नव्याने अस्तित्वात् आलेले नगर या भागाचा समावेश या प्रभागात करण्यात आले आहे ,सिडको हडको 20 प्रभागाची मतदार संख्या हि 32280 हजार तर कौठा प्रभागाची 28804 हजार आहे. या दोन प्रभागाची मतदार यादी करताना मनपाच्या निवडणुक विभागो मनपाच्या निवडणुकीच्या अध्यावत याद्याचे अवलोकन करत असताना सिडको -हडको प्रभाग 20 मधील असदवन या गावाची विभाजन करत बुथ क्रमांक 232 येथील अनेक मतदार हे कौठा प्रभागात 19 मध्ये समावेश केल्याने मतदारात संभ्रम झाला असून तात्काळ दुरूस्ती करून पुन्हा येथील असदवन भागाच्या समावेश 20 मध्ये करावा याबाबत मनपाचे माजी उपमहापौर विनय गिरडे पाटील ,नगरसेवक प्रतिनिधी संजय घोगरे पाटील,उदय देशमुख, शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख सुहास पाटील खराणे,माजी नगरसेवक राजु गोरे, राजु पाटील काळे पाटील ,सिध्दार्थ गायकवाड, सतिश बस्वदे,राजु लांडगे यांनी मनपाच्या निवडणुक विभागाकडे प्रारुप मतदान यादीवरुन आक्षेप नोंदवला आहे.

या मतदान याद्या दुरूस्ती करुन सिडको हडको प्रभागातील असदवन येथील मतदारांना पुन्हा प्रभाग २० मध्ये घ्यावे अशी मागणी मनपा आयुक्त डोईफोडे यांच्याकडे केली आहे.

# 'काँग्रेस'चे शशी थरूर भाजपमध्ये (कधी) जातील?



## संपादकीय

लोकांना आकर्षित करून घेणारे, प्रशासकीय विश्वासार्हता असणारे, सर्व समाजात स्वीकारले जाईल असे नेतृत्व भाजपच्या 'केरळ प्रकल्पा'त आजवर काही सापडलेले नाही. आसाममध्ये ही भूमिका हिमंता बिस्वा सरमा यांनी निभावली. काँग्रेसमधून फुटून आल्यानंतर त्यांनी भाजपचे भाग्यच उजळून दिले. इतकेच नव्हे, तर संपूर्ण ईशान्य भारताचा राजकीय नकाशाच बदलून टाकला. आता भाजपच्या रणनीतिकारांना असा प्रश्न पडला आहे की, ही अशीच काहीशी भूमिका शशी थरूर केरळमध्ये बजावू शकतील काय? केरळमध्ये भाजपचा आलेख अलीकडे उंचावू लागला आहे. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला ११.४० टक्के मते मिळाली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत हे प्रमाण १९.२४ टक्क्यांवर गेले; शिवाय थ्रिसूरमधील ऐतिहासिक विजयही पक्षाच्या पारड्यात पडला. एकेकाळी राज्यात पक्षाचे अस्तित्व केवळ प्रतीकात्मक होते. आता त्याच्या अस्तित्वाला निदान काहीतरी अर्थ प्राप्त झाला. तिरुवनंतपुरम मध्ये पक्ष ३७.१२ टक्के मते मिळवून दुसऱ्या क्रमांकावर होता. सात जागांवर पक्षाने चांगली मते मिळवली. वर्ष २०२५ मध्ये राजीव चंद्रशेखर यांनी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर आता पक्ष पुढे उडी मारण्याच्या पवित्र्यात आहे. या सगळ्या गणितात शशी थरूर 'नेमके' बसतात. केरळमधील तरुण आणि महिला वर्गात थरूर लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. अनेक काँग्रेस नेत्यांना जे जमत नाही ते त्यांना जमते. विशेषत: शहरी मतदारसंघात आणि पहिल्यांदा मतदान करणाऱ्यांमध्ये धर्म-वर्ग याच्या पलीकडे जाऊन थरूर यांच्याबद्दल आकर्षण दिसते. सरमा यांनी भाजपला आसाममध्ये वैचारिक लवचिकता आणि प्रशासकीय ताकद दिली. तशी बौद्धिक वैधता, जातीपातीच्या पल्याडचा संपर्क, अभिजन चेहरा थरूर केरळमध्ये देऊ शकतात. केरळसारख्या राज्यात राजकीय संदेशाइतकेच महत्त्व सांस्कृतिक आधुनिकतेला आहे. दुसऱ्या पक्षातून आपल्याकडे येणारा मोठा नेता इतकेच भाजपसाठी थरूर यांचे महत्त्व नाही. केरळमध्ये ते आसामसारखी चळवळ सुरू करू



शकतात. डिसेंबरमध्ये राज्यात पंचायतीच्या निवडणुका होत आहेत. राज्यातल्या ६५ हजार पंचायतींपैकी भाजपकडे सध्या फक्त १५५० पंचायती आहेत. हा आकडा वाढावा, यासाठी पक्षाची धडपड आहे. थरूर यांच्याशी गुंतलेल्या राजकीय शक्यता दुर्लक्षिता येणार नाहीत इतक्या दमदार आहेत. बिहार निवडणूक आटोपल्यावर भाजपला नवीन अध्यक्ष मिळेल, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले. आता बहुधा जानेवारी २०२६ मध्येही निवड होईल. २९ राज्यातल्या संघटनात्मक निवडणुका पूर्ण झाल्या असून उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि अन्य काही राज्यात त्या व्हायच्या आहेत. पुढच्या चार ते सहा आठवड्यांत हे काम पूर्ण केले जाईल; जेणेकरून राष्ट्रीय निवडणुकीचा मार्ग मोकळा होईल. धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव, मनोहरलाल खट्टर आणि शिवराजसिंह चौहान अशी काही नावे या सर्वोच्च पदासाठी चर्चेत आहेत. मात्र, भाजपला दलित मतदार आकर्षून घ्यावयाचे असतील तर या समाजातील नेता अध्यक्ष म्हणून निवडावा असा जोरदार युक्तिवाद केला जात आहे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 9 | 4 | | 7 | 3 | 6 | |
| | 3 | | | 5 | | | 4 | |
| | | | | | 9 | 8 | | 7 |
| | 7 | 5 | | 9 | | 6 | 1 | |
| 4 | | | | | | | | 8 |
| | 8 | 1 | | 4 | | 2 | 7 | |
| 3 | | 7 | 2 | | | | | |
| | 2 | | | 1 | | | 3 | |
| | 9 | 4 | 8 | | 3 | 1 | | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 3 | 5 | 4 | 2 | 8 | 7 | 1 | 6 |
| 2 | 7 | 4 | 1 | 5 | 6 | 8 | 3 | 9 |
| 8 | 1 | 6 | 9 | 7 | 3 | 5 | 4 | 2 |
| 1 | 4 | 8 | 6 | 3 | 5 | 2 | 9 | 7 |
| 3 | 5 | 2 | 8 | 9 | 7 | 1 | 6 | 4 |
| 7 | 6 | 9 | 2 | 4 | 1 | 3 | 8 | 5 |
| 6 | 2 | 3 | 7 | 8 | 4 | 9 | 5 | 1 |
| 4 | 8 | 7 | 5 | 1 | 9 | 6 | 2 | 3 |
| 5 | 9 | 1 | 3 | 6 | 2 | 4 | 7 | 8 |

पंचांग
२६ नोव्हेंबर २०२५
बुधवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:षष्टी २४:०२:१६+

नक्षत्र:श्रवण
२५:३२:३८+
योग:वृद्धि १२:४१:५७
करण:कौलव ११:३३:५९
करण:तैतिल
२४:०२:१६+

## उपदेशाचे डोस

### मातृभक्ती

त्या काळात सर आशुतोष मुखर्जी कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलपती तर होते शिवाय कलकत्त्याच्या उच्च न्यायालयात न्यायाधिशही होते. त्यांचा साधेपणा, हुशारी, रोखठोकपणा व आदर्श व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन इंग्रज सरकारने त्यांना इंग्लंडला पाठवण्याचे ठरवले. त्यानुसार परदेशी जाण्याची सर्व तयारी त्यांनी केली पण शेवटच्या क्षणी त्यांच्या आईने काही कारणांमुळे त्यांना इंग्लंडला न जाण्यास सांगितले. आईची आज्ञा शिरसावंद्य मानून एवढ्या चांगल्या संधीकडे त्यांनी पाठ फिरवली व सरकारला कळविले की, माझ्या आईला मी परदेशी जावे, असे वाटत नाही. त्यामुळे मला माझा प्रवास नाईलाजाने रद्द करावा लागत आहे. त्यावेळचा व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन हे पत्र पाहून अतिशय संतापला व म्हणाला, एका सामान्य भारतीयाची सरकारचा आदेश डावलण्याची हिंमत कशी झाली ? त्याने सर आशुतोष मुखर्जी यांना बोलावले व म्हणाला, जा, आपल्या आईला जाऊन सांगा की भारताचा व्हाईसरॉय तुमच्या मुलाला परदेशी जाण्याची आज्ञा देत आहे. त्यावेळी व्हाईसरॉयची आज्ञा न मानणे म्हणजे स्वत:वर संकट ओढवून घेण्यासारखे होते, पण आईच्या आज्ञेपुढे त्यांना कर्झनच्या आज्ञेची किंमत शून्य होती. ते आपल्या निश्चयापासून जराही विचलीत झाले नाहीत व गंभीर चेहऱ्याने व धाडसाने म्हणाले, महाशय, मी माझ्या आईच्या आज्ञेचे उल्लंघन करु शकत नाही. जगात आईच्या आज्ञेशिवाय कोणाचीही आज्ञा श्रेष्ठ मानत नाही. आमची परंपरा व संस्कृती आईला देवता म्हणून मानते व अशा देवीची आज्ञा माझ्या जीवात जीव असेपर्यंत मी मोडू शकत नाही. तेव्हा यासंबंधी कृपया आपण मला अधिक काहीही सांगू नका ! हा विषय माझ्या दृष्टीने संपला आहे. त्यांची मातृभक्ती पाहून कर्झन आश्चर्यचकित झाला व त्यांना प्रेमाने आलिंगन दिले.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- २००८ - १७ वर्षीय ब्रिटिश तरुणी हॅना फॉस्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणात लंडन येथील न्यायालयाने आरोपी महेंद्रपाल सिंह कोहलीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

### राष्ट्रीय

- २००७ - भारतीय फिरकी गोलंदाज अनिल कुंबळेने पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्यात सामनावीर बहुमान पटकावून सर्वाधिक वेळा बहुमान मिळविणाऱ्या सचिन तेंडुलकरच्या भारतीय विक्रमाची बरोबरी केली. त्याने १० व्यांदा सामनावीर बहुमान पटकावला.
- २००८ - मुंबईवर दहशतवाद्यांनी चढवलेल्या हल्ल्यात तीन वरिष्ठ पोलिस अधिकारी दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख हेमंत करकरे, एनकाऊंटर स्पेशलिस्ट विजय साळसकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक कामटे यांच्यासह १८० लोकांचा मृत्यू झालो. दहशतवाद्यांनी अतिशय गर्दी असणारे छत्रपती शिवाजी टर्मिनस (सीएसटी), दोन पंचतारांकीत हॉटेल्ससह एकूण आठ ठिकाणी अंदाधुंद गोळीबार करून सर्वसामान्यांना लक्ष्य केले. शिवाय बॉम्बस्फोटही घडविले.


### जन्म

- १९५२ - वेंडी टर्नबेल, ऑस्ट्रेलियाचा टेनिसपटू.
- १९७२ - अर्जुन रामपाल, बॉलीवुड अभिनेता.

### निधन

- १९३९ - जेम्स नेस्मिथ, बॉस्केटबॉलचा संशोधक.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४६



**आडवे शब्द**

१. रवळ
४. पांडुरंगाचे हात अशा स्थितीत आहेत
७. घराण्याची प्रथा
११. मोजणी
१३. संसदेचा सदस्य
१५. मनाचे श्लोक लिहिणारे संत
१७. सैन्याचा दाणागोटा
१९. शीखांचे संबोधन
२०. आकाश
२१. बोटाच्या टोकावरील कडक आवरण
२२. गजऱ्यातील सुगंधी वनस्पती
२४. कमी बोलणारा
२५. तृप्त न होणारी भूक
२७. झाडाभोवतीचा कट्टा
२८. डोळे
३०. दक्ष
३२. पैशाचा ढीग
३३. डावा
३५. सज्जन, प्रामाणिक
३६. शंकर (हिंदी)
३८. तेजस्वी, राजबिंडा
४०. बेडकांचे ओरडणे
४३. रक्षण करणारा
४५. जामीन (हिंदी)
४७. डोक्याला थंडावा देणारी व केसांची वृद्धी करणारी सुगंधी वनस्पती
५०. अर्धी ओंजळ
५२. माणूसकी
५९. लोकांसमोर न घाबरता बोलणारा
६०. नवरा
६१. कोशिंबिरीचे फळ
६३. पवित्र
६५. आवरण
६६. तेज, कांती
६८. बटवडा, वितरण
७०. रक्त देणे
७३. -- -- धन म्हणजे सर्वस्व
७४. क्वचित
७७. प्रेरणा, गती
७८. शहर, मोठे गाव
८०. देवाण-घेवाण
८३. रहित, बाद
८४. अटीची भाषा
८५. वेडावाकडा

**उभे शब्द**

१. खबदाड
२. श्रीकृष्णाचे एक नाव
३. मातीचा कण
४. गुणज्ञ
५. कोठार, गोदाम
६. फळातील द्रव
७. पंख
८. पराजय
९. कबीराचे देव
१०. हास्याचे पीक
१२. सेवक
१४. संत रामदासांनी लिहिलेला ग्रंथ
१६. राक्षस
१८. एकरुप
२३. दुर्भिक्ष्य, चणचण
२४. सेपे नसलेले
२६. शंकराचे एक नाव
२७. सीमा, मर्यादा
२९. मृत्यूचा राजा
३१. फुरसत
३४. डाळीचे पीठ
३५. धनको, कर्ज देणारा
३७. तीनपट
३९. हिशोबाची एक बाजू
४१. मुंबईचा घरगडी
४२. अत्यंत तिखट मसालेभात
४४. माफी मागणारा
४६. तापविणारा सूर्य
४८. संध्याकाळ
४९. पाणी व जमीन दोन्हीकडे वास्तव्य करणारे प्राणी उदा. कासव, मगर इ.
५१. हळू, संथ
५३. चामखीळ
५४. कहाणीतील गाव
५६. त्रिगुणांतील दुसरा- सत्व -- तम
५७. सन्मानाची रक्कम
५८. दही घुसळून केलेले पेय
६२. कोवळा अंकुर
६४. बशीचा जोडीदार
६७. वेदना, त्रास
६८. बुटका बटु
६९. विसरभोळा
७१. वैरी, खटला दाखल करणारा
७२. अकस्मात
७५. शिकार
७६. ब्राह्मण
७९. भुक्कड
८०. बाहेरच्या विरुद्ध
८१. खटला
८२. तोल, डौल

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ४४ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.नराधम ४.सरकार ७.कासार १०.दारा ११.मस्त १२.करवत १४.यच्चयावत १५.फारकत १६.पत १७.नवनीत २०.लाचार २२.बाला २३.मालक २५.घड २६.संपादकीय २८.नटराज ३०.बक ३२.तर ३३.नवस ३४.लयबद्ध ३५.भगवान ३७.वाचा ३९.कल ४२.रजई ४३.राजाराणी ४४.न्यायालय ४५.हत्या ४६.गंधक ४८.काजवा ४९.टपोरा ५१.जागर ५२.लता ५४.पर्वत ५६.चपापणे ५८.उदार ५९.अवसर ६०.बेसुमार ६२.जननमरण ६४.सखा ६७.नस ६८.रसदार ६९.वंदनीय ७२.रटाळ ७४.रटरट ७६.तडकाफडकी ७७.रोज ७८.कसर

उभे उत्तर : १.नमनाला घडाभर तेल २.रास्त ३.मकर ४.सवत ५.रत ६.रयत ७.कायापलट ८.साव ९.रतन १०.दामिनी १३.रकमपात १५.फार १६.पलायन १८.वर्ण १९.तडक २१.चाड २२.बाकी २३.मानसकन्या २४.कराल २७.दरवाजा २९.जयजयकार ३०.बद्ध ३१.सवाई गंधर्व ३६.गज ३८.चाराचुरा ४०.लयास जाणे ४१.आत्या ४३.राकट ४५.हवालदार ४७.आसपास ५०.पोळ ५३.तार ५४.पपनस ५५.तलम ५६.चवदार ५७.परसदार ५८.उमा ६१.सुरवंट ६२.जनमत ६३.रडारड ६५.खारट ६६.पाय ७०.नीरस ७१. मोका ७३.टाकी ७५.रस्ता

# सुपा विभागात उद्यापासून दिवसा कृषी वीजपुरवठा

## बिबट्याच्या हल्ल्यांत वाढ – राहुल पाटील शिंदे यांच्या मागणीस मंजुरी.!!

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पारनेर तालुक्यातील तालुक्यातील रांजणगाव, आस्तगाव, पिंपरी गवळी, आपधुप, सुपा, भोयरे, गवळीकडूस, बाबुर्डी, वाळवणे, रायतळे,हंगा, मुंगशी, लोणी हवेली ,आणि रूई छत्रपती या गावांमध्ये गेल्या अनेक दिवसांत बिबट्याच्या हालचाली व हल्ल्यांत वाढ झाल्याने शेतकरी रात्री पंप चालवण्यासाठी शेतात जाण्यास असुरक्षित वाटत होते.

या पार्श्वभूमीवर संबंधित ग्रामपंचायतींनी दिवसा कृषी वीजपुरवठ्यास हरकत नसल्याची NOC सुपा शाखेकडे सादर केली. तसेच राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरपंचांचे Delegation (शिष्टमंडळ) यांनीही या मागणीसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत सुपा कार्यालयात अधिकृत निवेदन दिले होते.

सर्व NOC व Delegation च्या निवेदनांचा आढावा घेतल्यानंतर सुपा शाखा अभियंता श्री. पिसाळ यांनी संपूर्ण बाब कार्यकारी अभियंता श्री. योगेश चव्हाण व उपकार्यकारी अभियंता श्री. शरद गहंदुळे यांच्यासोबत चर्चेस ठेवली. त्यानंतर संबंधित कृषी फीडरची सविस्तर feasibility तपासणी करण्यात आली.

> सुपा परिसरात बिबट्याची मोठ्या प्रमाणात दहशत आहे गहू, कांदा या पिकांना पाणी भरण्यासाठी दिवसा वीज नसल्याने पर्यायाने रात्री जागून भरणे काढावे लागत आहे. त्यातच परिसरात बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना वाढल्या आहे. त्यामुळे परिसर भितीच्या छायेखाली आहे. महावितरणने अधिक अंत न पाहता दिवसा थ्री फेज वीज द्यावी.
> **-राहुल पाटील शिंदे ( भारतीय जनता पार्टी पारनेर-सुपा मंडल अध्यक्ष)**



ठाणे : आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिवा शहरात आपली राजकीय ताकद सिद्ध करण्यासाठी शिवसेना दिवा उपशहर प्रमुख मा. शैलेश मनोहर पाटील यांनी आपल्या प्रभागातून जोरदार संघटनात्मक बांधणी सुरु केली आहे. दिवा पश्चिम येथील एन आर नगर शिवसेना शाखेत शाखाप्रमुख सुनील कांबळे यांच्या उपस्थित उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, शिवदूत व कार्यकर्ते मिटिंगला उपस्थित होते. दिव्यात केलेल्या विकास कामांचा आढावा घेतला जात आहे. सदर ठाणे महानगर पालिकेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे तगडे उमेदवार असल्याने या निवडणुकीत शिवसेनेचेच वर्चस्व राहील असा विश्वास पक्ष्याच्या नेत्यांकडून केला जात आहे. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...

### विकासाऐवजी टीका-टिप्पणी; मंचर निवडणुकीत ‘नकारात्मक’ वळण

मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीची निवडणूक ज्या विकासकामांवर आधारित असायला हवी होती, ती आता पूर्णपणे वेगळ्याच दिशेने वळताना दिसत आहे.काही राजकीय पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते आपल्या प्रतिस्पर्धी पॅनलप्रमुखांवर किंवा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांवर थेट टीका करण्याच्या मोहिमेत उतरले आहेत.विकासकामांच्या स्पर्धेपेक्षा आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीमुळे निवडणुकीचे रणांगण तापले आहे. सोशल मीडिया, सार्वजनिक सभांपासून ते चौकातील गप्पांपर्यंत सर्वत्र आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू असून, मतदारांमध्येही गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.विकासाच्या मुद्द्यांवर भूमिका मांडण्यापेक्षा प्रतिस्पर्ध्यांच्या कमतरता शोधून त्यांचा प्रचारात उपयोग करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे प्रचाराचा स्तर खालावत असून विकासकामांची खरी चर्चा मागे पडत चालली आहे. अनेक नेत्यांनी सार्वजनिकरित्या केलेल्या टीकेत वैयक्तिक उल्लेख, आरोप, उणिवा मिरवण्याची प्रवृत्ती वाढल्याने निवडणूक वादग्रस्त होत आहे.या परिस्थितीमुळे मतदारही संभ्रमात पडले आहेत. “विकासासाठी निवडणूक लढतेय की वैरासाठी?” असा प्रश्न अनेक मतदार आता खुलेपणाने विचारू लागले आहेत. पाणी, रस्ते, स्वच्छता, वाहतूक, कचरा व्यवस्थापन अशा स्थानिक गरजांवर उमेदवारांनी भाष्य करण्याऐवजी नकारात्मक प्रचारात रुची दाखवल्याने मतदार नाराजी व्यक्त करत आहेत.एकूणच, मंचर नगरपंचायतीची निवडणूक विकासकामांच्या स्पर्धेपेक्षा आरोप-प्रत्यारोपांच्या रणांगणात रूपांतरित झाली असून, पुढील काही दिवसांत हा स्वर अधिक तीव्र होण्याची शक्यता दिसते.

### थंडीच्या शेकोट्यांत रंगल्या मंचरच्या राजकीय गप्पा

मंचर (स. गांवकरी) : मंचर परिसरात थंडीचा कडाका जाणवू लागल्याने वाड्या-वस्त्यांवर शेकोट्यांची उब वाढली असून त्या शेकोट्यांभोवती राजकीय गप्पांचे फड रंगताना दिसत आहेत.मंचर नगरपंचायत निवडणुक मतदानाचे दिवस जवळ आले असल्याने प्रत्येक प्रभागात कोणाची हवा आहे, कोणता उमेदवार वरचढ ठरेल, कोणाचे समीकरण मजबूत आहे यावर नागरिक छातीठोकपणे अंदाज वर्तवत आहेत. गावोगावी शेकोट्यांजवळ बसलेल्या नागरिकांच्या चर्चेला सकाळपासून रात्रीपर्यंत ऊत येत आहे. एखाद्या उमेदवाराचा नाव घेतला की समर्थक आणि विरोधक यांच्यात कधी कौतुक तर कधी शाब्दिक खोडसाळ चर्चा होताना दिसते. काहीजण तर प्रभागनिहाय निकालाचे भाकीत करताना राजकीय गणिते मांडतात.निवडणुकीची हवा कोणाच्या बाजूने आहे, कोणते नवे समीकरण तयार होत आहेत, कोणाची कामगिरी मतदारांना भावते यावरही जोरदार चर्चा रंगत आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी पेटवलेल्या शेकोट्या आता निवडणुकीच्या राजकीय तापमानाने अधिकच धगधगू लागल्या आहेत.तरुण, ज्येष्ठ नागरिक, कामगार, दुकानदार अशा विविध थरातील लोकांच्या गप्पांनी या शेकोट्यांजवळची रात्र अधिकच गजबजलेली दिसत आहे.नगरपंचायत निवडणुकीचे वातावरण तापत चालल्याने पुढील काही दिवस या राजकीय गप्पांना अधिकच ऊत येणार हे निश्चित.




### आधार ठसे न उमटल्याने ज्येष्ठ नागरिक वंचित; तालुकास्तरावर समितीची मागणी

मंचर (स. गांवकरी) : अनेक ज्येष्ठ नागरिकांचे हाताचे ठसे मशीनवर उमटत नसल्यामुळे त्यांचे आधार कार्ड तयार होत नाही.परिणामी शासकीय योजनांतील कोणताही लाभ त्यांना मिळत नसून अनेक गरीब कुटुंबे पूर्णपणे योजनेपासून वंचित आहेत. आधार ठसे न उमटल्याने ज्येष्ठ नागरिक वंचित राहत असल्याने शासकीय योजनाचा लाभ देण्यासाठी तालुकास्तरावर समितीची मागणी नागरिकांकडून होत आहे. शासनाने विविध लाभयोजना राबवल्या असल्या तरी बायोमेट्रिक ठसे न उमटल्याने अर्ज प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत.यामुळे निवृत्त, आजारी आणि नाजूक स्थितीत असलेल्या नागरिकांना मदत मिळत नाही.स्थानिक नागरिकांच्या मते, शासनाने तालुकास्तरावर स्वतंत्र समिती नेमून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी आणि ठसे न उमटणाऱ्या नागरिकांना पर्यायी ओळखप्रमाणाद्वारे लाभ द्यावा.अनेक कुटुंबांना आर्थिक मदत, घरकुल, पेन्शन, अन्नधान्य यांसारख्या योजनांचा लाभ थेट मिळू शकतो. अन्यथा शासनाने आखलेल्या योजनांचा उद्देश अपूर्ण राहतोय, अशी भावना व्यक्त होत आहे.ज्येष्ठ नागरिकांसाठी तातडीची उपाययोजना राबविण्याची मागणी आंबेगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळूंज यांनी केली आहे.पोंदेवाडी येथील ज्येष्ठ महिला चंद्रभागा बबन पोखरकर यांचे हाताचे ठसे उमटत नसल्यामुळे, आधार कार्ड काढता येत नसल्याने शासकीय योजनाचा लाभ मिळत नाही.अनिलभाऊ वाळुंज युवा प्रतिष्ठान पोंदेवाडी यांच्यावतीने शौचालय बांधकामासाठी बारा हजार रुपये वैयक्तिक स्वरुपात देण्यात आले. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

“आधार कार्ड न झाल्याने मला पेन्शन, अन्नधान्य आणि वैद्यकीय मदत मिळत नाही.रोज कार्यालयात फेऱ्या मारूनही मशीन माझे ठसे घेत नाही. शासनाने आम्हाला पर्यायी मार्ग द्यावा.

- चंद्रभागा पोखरकर,ज्येष्ठ महिला पोंदेवाडी.

# अहिल्यानगर सिव्हिलमध्ये एम.बी.बी.एस. प्रवेश प्रक्रियेला सुरूवात!

- **खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला मोठे यश!**

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकत जिल्हा शासकीय रुग्णालयात (सिव्हिल) एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला नव्या वर्षात सुरूवात होणार आहे. स्थानिक पातळीवर पहिल्यांदाच पूर्ण क्षमतेचे वैद्यकीय शिक्षणकेंद्र उभारण्याचा मार्ग यामुळे मोकळा झाला असून, जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना आणि रुग्णांना दीर्घकाळाची प्रतीक्षा अखेर संपणार आहे. खासदार नीलेश लंके यांनी त्यासाठी गेली दीड वर्ष पाठपुरावा केला होता.

नव्याने उभारण्यात येणाऱ्या मेडिकल कॉलेजसाठी सिव्हिल हॉस्पिटल सात वर्षांच्या करारावर हस्तांतरित करण्याची प्राथमिक प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी दिली. सध्या या रुग्णालयात दररोज सुमारे ४८० ते ५०० रुग्ण ओपीडीद्वारे उपचार घेतात, तर २८२ बेड क्षमतेच्या या रुग्णालयात परिसरातील बीड, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे जिल्ह्यांतील रुग्णांनाही महत्त्वाची सेवा दिली जाते.

अहिल्यानगरमध्ये मेडिकल कॉलेज सुरू करण्यासाठी गेल्या दीड वर्षांपासून खासदार नीलेश लंके सातत्याने पाठपुरावा करत होते. जिल्ह्याची तातडीची गरज ओळखून त्यांनी दिल्लीत केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांची भेट घेऊन अहिल्यानगरची वास्तवस्थिती सविस्तर मांडली. या भेटीनंतर केंद्रीय मंत्री नड्डा यांनी लिखित स्वरूपात सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याचे आश्वासन दिले होते.

खासदार लंके यांच्या या सातत्यपूर्ण आणि आक्रमक पाठपुराव्यामुळेच राज्य सरकारकडून मेडिकल कॉलेजच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. महसूल विभागाकडून नालेगाव, अरणगाव आणि कापूरवाडी या ठिकाणांची पाहणी सुरू असून, कायमस्वरूपी ठिकाण निश्चित होईपर्यंत सिव्हिल हॉस्पिटलचा तात्पुरता वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मेडिकल कॉलेज सुरू झाल्यानंतर जिल्ह्यात प्रथमच २४ तास तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता, आधुनिक वैद्यकीय सुविधा आणि अतिगंभीर रुग्णांसाठी उपचाराची स्थानिक सोय निर्माण होणार आहे. जिल्ह्याच्या आरोग्य पायाभूत सुविधांना नवा आयाम मिळवून देणारी ही प्रक्रिया खासदार नीलेश लंके यांच्या दीड वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे मोठे यश मानले जात आहे.

### अती गंभीर आजार असलेल्या रुग्णांवर उपचार

हे महाविद्यालय सुरू झाल्याने आता अती गंभीर आजार असलेल्या रुग्णांवर अहिल्यानगर येथेच उपचार होणार आहेत. आजवर अशा रुग्णांना छत्रपती संभाजीनगर ( घाटी ) किंवा पुणे ( ससून) येथे जावे लागत असे.




# राजूर पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यावर धडक कारवाई!

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

- **८९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त!**

अकोले तालुक्यातील दिगंबर रोड परिसरात अवैध देशी दारू विक्री करणाऱ्या एकावर राजूर पोलिसांनी सोमवारी दुपारी धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत एकूण ८९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अकोले (शाहूनगर) येथील राजेश बबन शिंदे हा एम.एच.१७/२५७८ क्रमांकाच्या मोटरसायकलवरून दिगंबर रोड भागात अवैधरीत्या देशी दारूची वाहतूक व विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या पथकाने सोमवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास छापा टाकला.

# जगात आई सारखे दुसरे दैवत नाही : हभप दयानंद महाराज कोरेगावकर

- **कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे किर्तनाचा कार्यक्रम**

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**



आई वडील हे जगातील सर्वात मोठे तीर्थ असुन प्रत्येकानी मृत्यू नंतर आपली किर्ती ह्या जगात राहील असे जीवन जगले पाहिजे. जगात आई सारखे दुसरे दैवत नाही. आई वडिलांची सेवा करा ती परमेश्वर चरणी रुजू होते. देवाने कोट्यवधीचे शरीर दिले त्याची योग्य निगा राखणे हे आपले कर्तव्य असून भगवंताच्या नामात मोठी शक्ती असल्याने प्रत्येकाने भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे. जीवन हे संघर्षमय आहे, प्रत्येक गोष्टीसाठी आपणास संघर्ष करावा लागत असतो. संघर्षमय जीवनात संतांचे विचार आपणास नेहमीच मार्गदर्शक ठरतात, असे प्रतिपादन किर्तनकार हभप दयानंद महाराज कोरेगावकर यांनी केले.

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे कै.ताराबाई (भाभी) लालासाहेब थेटेपाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त मंगळवार दि.२५ रोजी किर्तन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक संपतराव म्हस्के, बाळासाहेब साळुंके, दादासाहेब सोनमाळी, बापूसाहेब काळदाते, बाळासाहेब सपकाळ, प्रा.किरण पाटील, गुलाब तनपुरे, डॉ.विलास कवळे, डॉ.चंद्रकांत कोरडे, अशोक खेडकर, रघुआबा काळदाते, माजी सभापती मिनाक्षीताई साळुंके, पुजा सुर्यवंशी, अनिल पांडुळे, बाबासाहेब गांगर्डे, माजी उपसभापती प्रशांत बुद्धीवंत, संजय अनभुले, धनंजय मते, सचिन निंबोरे, संपत बावडकर, बापू साळवे, डॉ.राजेश तोरडमल, सुभाष सुर्यवंशी, हरी पांडुळे आदींसह डिकसळचे सरपंच जयसिंग थेटेपाटील, कॉंग्रेसचे तालुका उपाध्यक्ष सतिष थेटेपाटील, विलास थेटेपाटील तसेच परिसरातील ग्रामस्थांसह जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, जगात सर्वांना उपमा आहेत. मात्र, आई ही आईच. तिची ममता, करुणा, संस्कार यांसह विविध गुणांची बरोबरी कुणीच करू शकत नाही. ते घरातील जीवन लढा देणाऱ्या संस्काराचे विद्यापीठ आहे. जगात अनेक गर्भ श्रीमंत माणसे आहेत. मात्र, आई वडिलांचा सांभाळ न करणारे कमनशिबी आहेत. संत वचन हे नेहमी सत्य असतात. त्यांच्या ज्ञानाने परमेश्वर आणि मनुष्य यांच्यातील दुवा साधण्याचे काम संत करत असतात. संतांनी दाखविलेल्या सत्मार्गावर चालल्यास आपले जीवन धन्य होत असते. आई- वडीलांच्या प्रति कृतज्ञता म्हणजेच त्यांच पुण्यस्मरण साजरा करणे होय. त्यांचा विसर पडू न देता आपण आपले पुण्यफलातील कार्य अविरत केले पाहिजे.

# समाजासाठी समर्पण आणि ग्रामीण विकासाचा नवा अध्याय

- **सूर्य उद्योग समूह संचलित श्रीमती मंदाकिनीताई निखाडे प्रायव्हेट मार्केट या उपक्रमाचा भव्य शुभारंभ**

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

सोहळा बुधवारी पार पडत असून, यावेळी परिसरातील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, महिला बचतगट, शेतकरी, तरुणांचा उपस्थितीचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या सोहळ्याचे धर्माध्यक्ष म्हणून अनिकेतानंद महाराज (विसापूर) यांनी मंगलाशीर्वाद दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार श्री. नितीनभाऊ पवार (कळवण–सुरगाणा विधानसभेचे लोकप्रिय जनप्रतिनिधी) उपस्थित होते. ग्रामीण विकासासाठी मोलाचा उपक्रम सूर्य उद्योग समूहाद्वारे उभारण्यात आलेले हे प्रायव्हेट मार्केट ग्रामस्थांसाठी रोजगार, शेतकऱ्यांसाठी बाजारपेठ आणि महिलांसाठी उद्योग व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देणार आहे. ग्रामीण भागातील आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने ही अत्यंत महत्त्वाची पावले असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

उपस्थित मान्यवरांचे प्रतिपादन

अनिकेतानंद महाराजांनी आशीर्वचनात सांगितले की —“गाव उभं रहातं तेव्हा समाज उभा राहतो. महिलांच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीशिवाय विकास अशक्य आहे. मंदाकिनीताईंचा हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल.”

आमदार नितीन पवार म्हणाले “कळवण तालुक्यातील ग्रामीण भागाला सक्षम बनवण्यासाठी असे उद्योग आणि बाजारपेठेचे केंद्र अत्यंत गरजेचे आहेत. युवकांना रोजगार आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, हेच आमचे ध्येय आहे.”

याच शुभारंभदिनी वृत्तपत्रकार व सामाजिक कार्यकर्ते यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष्यमान रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने युवकांनी उत्साहाने सहभाग घेऊन रक्तदान केले.

# भारतीय संविधानाच्या क्रमश: वाचनाचा आज समारोप

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

दक्षिण विभागातील तसेच लोहा तालुक्यातील विश्वशांती बुद्ध विहार जवळा (दे.) येथे संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दररोज रात्री आठ वा. भारतीय राज्यघटनेचे क्रमशः वाचन करण्यात आले. जवळा येथील विश्वशांती बुद्ध विहार समिती, सार्वजनिक भीम जयंती मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखेच्या माध्यमातून विविध उपक्रम विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी राबविले जातात. त्यामध्येच भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष अर्थात 26 नोव्हेंबर 1949 रोजी हे संविधान देशासाठी अर्पण करण्यात आले होते. तेव्हापासून सध्या 75 वे वर्ष चालू असून, हे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून संपूर्ण भारतभर मोठ्या हर्षोउल्हासामध्ये साजरे करीत आहोत. त्याच अनुषंगाने विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी भारतीय राज्य घटनेच्या वाचनाने हे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले आहे.

# ओबेन इलेक्ट्रिकचा नागपुरात विस्तार

## माननीय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपुरात च्या ७५ व्या शोरूमचे उद्घाटन

- **या लॉंचसह, ओबेन इलेक्ट्रिक आता महाराष्ट्रात ७ शोरूम चालवणार आहे.**

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**



माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये ओबेन इलेक्ट्रिकच्या ७५ व्या शोरूमचे उद्घाटन केले, जो भारतातील स्वदेशी आणि संशोधन आणि विकास-चालित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादकासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. या वाढीमुळे महाराष्ट्रात ओबेन इलेक्ट्रिकची उपस्थिती आणखी मजबूत झाली आहे आणि इथे ओबेन रॉर ईझी सिग्माची मागणी वेगाने वाढत आहे. या लॉन्चसह, ओबेन इलेक्ट्रिक आता संपूर्ण महाराष्ट्रात ७ शोरूम चालवत आहे, जी नागपूर, पुणे (वाकड, शिवाजीनगर, अरण्येश्वर, चिंचवड); छत्रपती संभाजीनगर (जालना रोड); आणि सोलापूर (बार्शी) येथे आहेत. कंपनीने आधीच भारतभर ७५ शोरूम आणि सर्व्हिस सेंटरपर्यंत विस्तार केला आहे आणि ती, या आर्थिक वर्षाच्या अखेरीस तिचे नेटवर्क १५० हून अधिक शोरूम आणि सर्व्हिस सेंटरपर्यंत वाढवण्याच्या मार्गावर आहे.

ग्राहकांच्या वाढत्या मागणीमुळे आणि देशभरात ईव्ही च्या वाढत्या स्वीकारामुळे, बेंगळुरू, दिल्ली, कोची, जयपूर, अमृतसर, हैदराबाद आणि लखनऊ यासारख्या प्रमुख भारतीय शहरांमध्येही तिने मजबूत उपस्थिती राखली आहे.

या लॉंचबद्दल बोलताना, ओबेन इलेक्ट्रिकच्या संस्थापक आणि सीईओ मधुमिता अग्रवाल म्हणाल्या, “आम्हाला रायडरकडून प्रचंड सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे, ज्यामुळे ओबेन इलेक्ट्रिकची देशव्यापी उपस्थिती वाढवण्याच्या आमच्या प्रयत्नांना चालना मिळत आहे.

नागपूरमधील आमच्या ७५ व्या शोरूमचे लॉंचिंग हे, प्रीमियम कम्युटर इलेक्ट्रिक मोटारसायकली अधिक सुलभ बनवण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देते. ग्राहक-प्रथम दृष्टिकोन आणि मजबूत अंतर्गत संशोधन आणि विकास यांच्या पाठिंब्याने, आम्ही केवळ नाविन्यपूर्ण उत्पादनेच नव्हे, तर मालकी हक्काला अधिक सुधारित करणारी संपूर्ण ईव्ही इकोसिस्टम प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करतो.”

# पीबीएमएच्या शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलचे उद्घाटन

**सोलापूर : (समर्थ गांवकरी)**

शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलच्या रूपाने सोलापूर मध्ये जागतिक दर्जाच्या व निरंतर नेत्र चिकित्सा सेवांचे नवे पर्व सुरू झाले असून याचे उदघाटन एका दिमाखदार सोहळ्यात पार पडले. पीबीएमए चे एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटल,पुणे आणि संकरा आय फाऊंडेशन, युएसए च्या सहयोगाने शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल हे अद्ययावत नेत्रचिकित्सा रुग्णालय सोलापूर मध्ये सुरु करण्यात आले आहे. यावेळी उद्घाटन समारंभाकरिता प्रमुख पाहुणे म्हणून संकरा आय फाऊंडेशन, युएसएच्या



विश्वस्त मंडळाचे सदस्य वेंकट मद्दीपति,संकरा आय फाऊंडेशन, युएसए चे विश्वस्त दिव्योगी पटेल आणि सन्माननीय पाहुणे म्हणून कल्पतरू फाउंडेशन, यूएसए चे संचालक अमोल कुलकर्णी आणि प्रतिभा बाचल हे उपस्थित होते. यांसह पीबीएमएच्या एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटलच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य आणि एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे चेअरमन नितीन देसाई, अध्यक्ष राजेश शहा, उपाध्यक्ष सुधीर साबळे, सचिव राहुल राठी, खजिनदार मयुर व्होरा आणि चंद्रकिशोर व्होरा व धनराज पाटील,तसेच साबळे परिवारातील अरुण साबळे व संजय साबळे, एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटलच्या संचालक मंडळाचे सदस्य व एच.व्ही देसाई आय हॉस्पिटलचे कार्यकारी संचालक परवेझ बिलीमोरिया, मुख्य वैद्यकीय संचालक डॉ.राहुल देशपांडे, वैद्यकीय संचालक डॉ.कुलदीप डोळे आणि शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलचे सहयोगी संचालक सुधीर सुधाळ आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

खेड,बार्शी रोड येथे दोन एकर प्लॉट मध्ये 54,000 चौरस फुट अशा प्रशस्त जागेत हे रुग्णालय विस्तारलेले आहे. या सुविधेचा उद्देश सोलापूर व आसपासच्या भागांसाठी आधुनिक व उच्च-गुणवत्तेच्या नेत्रचिकित्सा सेवा प्रदान करणे आहे.

पीबीएमएच्या एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटलचे चेअरमन नितीन देसाई म्हणाले की, सरासरी जीवनमान वाढत असताना मोतीबिंदू शस्त्रक्रियांसाठीच्या सेवांची गरज वाढणार आहे. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा ही एक सुरुवात असून निरंतर सेवा या महत्त्वाच्या ठरतील. त्यादृष्टीने या नेत्र रुग्णालयाने पावले उचलली असून पहिल्या 45 दिवसातच 1100 शस्त्रक्रिया केल्या आहेत. त्यांनी संकरा आय फाऊंडेशन व सर्व दात्यांचे आभार मानले.



मंचर प्रतिनिधी : खडकी (गणेशवाडी) ता.आंबेगाव येथील जय बापू पोखरकर आणि साईराज मनोज पोखरकर यांची भारतीय सैन्य दलामध्ये निवड झाल्याबद्दल माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते मंचर येथे सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी भीमाशंकर कारखान्याचे संचालक दादाभाऊ पोखरकर,आंबेगाव तालुका खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष पांडुरंग किसन पाटील,सातगाव पठार येथील राष्ट्रवादीचे युवक अध्यक्ष सुशांत नवले,राष्ट्रवादीचे सरचिटणीस विकास पोखरकर,राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष दीपक बांगर,मनोज पोखरकर,बापूशेठ पोखरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...




### पारदर्शक व्यवहार, विश्वासार्ह व ग्राहकाभिमुख सेवेसाठी तत्पर : माने

**पुणे (स. गांवकरी) :** बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांच्या हितासाठी कार्यरत दी प्रोफेशनल रिअल्टर्स ऑफ पुणे (प्रॉप) वेल्फेअर असोसिएशनच्या अध्यक्षपदी उदयन माने, उपाध्यक्षपदी तनुज नगरानी व नीरज सिंग, सचिवपदी मनीष दीडमिसे, तर खजिनदारपदी मुरली रमणी यांची निवड झाली आहे. २०२५-२०२७ या कालावधीसाठी 'प्रॉप'च्या नव्या कार्यकारिणीची निवड नुकतीच करण्यात आली. नवीन कार्यकारिणीमध्ये संचालक म्हणून ॲड. महेश यादव (प्रॉप ग्रोथ), दिनेश राठी (प्रशिक्षण व मेंटरशिप सर्कल्स), विक्रम मलिक (बिझनेस एक्स्चेंज व क्रॉस सेल), सारंग मद्रेवार (क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम), रवींद्र यादव (डिजिटल, पीआर व मीडिया) आणि प्रीत कोहली (इव्हेंट्स, एंगेजमेंट व नेटवर्किंग) यांची नियुक्ती झाली. मावळते अध्यक्ष दर्शन चावला, संस्थापक अध्यक्ष किशन मिलानी, खालिद मेनन सल्लागार मंडळात, तर 'एनएआर इंडिया'चे चेअरमन रवी वर्मा मार्गदर्शक म्हणून कार्यरत राहतील. उदयन माने म्हणाले, "पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील रिअल इस्टेट व्यावसायिकांचे प्रतिनिधित्व करणारी 'प्रॉप' ही संस्था नॅशनल असोसिएशन ऑफ रिअल्टर्स-इंडियाशी संलग्नित आहे. पुणे हे बांधकाम क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत असलेले शहर आहे. त्यामुळे रिअल इस्टेट व्यावसायिकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, प्रमाणित सदस्यांची डायरी आणि घर खरेदी-विक्री प्रक्रियेत ग्राहकांना योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी जनजागृती सत्रांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे विकसक, कायदा विशेषज्ञ आणि नियामक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होईल."

### उमराहच्या आध्यात्मिक प्रवासातून आसिफ शेख झाले भावुक



**पुणे (स. गांवकरी) :** टीव्हीवरील सर्वांच्या लाडक्या विभूती नारायण मिश्राची भूमिका गाजवणारे आसिफ शेख अलीकडेच त्यांच्या एका खास आणि हृदयस्पर्शी अनुभवामुळे प्रेक्षकांच्या चर्चेत आले आहेत. लोकप्रिय मालिकेतील दमदार अभिनयासोबतच आता त्यांचा उमराहचा आध्यात्मिक प्रवासही मने जिंकतोय. नुकतेच आसिफ यांनी कुटुंबासोबत उमराहची तीर्थयात्रा केली आणि हा प्रवास त्यांच्या आयुष्यातील सर्वात शांत, समाधानदायक आणि भावनिक क्षणांपैकी एक ठरला. "गेल्या वर्षी मी एकटाच उमराहला गेलो होतो आणि तेव्हा स्वतःलाच वचन दिलं होतं—एक दिवस मी माझ्या संपूर्ण कुटुंबासोबत इथे परत येईन. यंदा ते अनपेक्षितपणे पूर्ण झालं," असं ते प्रेमाने सांगतात. योगायोग असा की त्यांच्या वाढदिवसादिवशीच ते मक्का येथे पोहोचले आणि कुटुंबासोबत केलेली प्रार्थना त्यांच्यासाठी 'ब्लेसिंग' ठरली. आसिफ पुढे सांगतात, "खरं तर मला सर्वात भावलेली गोष्ट म्हणजे आमचं कुटुंब एकत्र वेळ घालवत होतं. घरी आपण एकत्र राहतो, पण मनमोकळेपणाने वेळ देणं क्वचितच जमतं. मक्का–मदिना येथे आम्ही एकत्र प्रार्थना केली, चाललो, बोललो, भावना शेअर केल्या. तेथील सकारात्मक वातावरण अवर्णनीय आहे." या प्रवासाने त्यांना आयुष्यातील अनेकदा दुर्लक्षित होणाऱ्या आशीर्वादांचीही जाणीव करून दिली. "कुटुंबासोबत उमराह करणं हा अनुभव माझ्या आयुष्यात कायम स्मरणात राहील," असे त्यांनी सांगितले. दरम्यान, प्रेक्षकांना पुन्हा एकदा आसिफ शेख उर्फ विभूती नारायण मिश्राची खिलखिलती आणि खट्याळ दुनिया पाहायची असेल, तर 'भाबीजी घर पर है' हा हिट शो पाहायला विसरू नका— दर सोमवार ते शुक्रवार, रात्री 10.30 वा., फक्त &TV वर!

# विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्याच्या मिशन मध्ये करण्यात आली वाढ

**नंदुरबार : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील उत्तरे कडील आदिवासी जिल्हा असलेल्या नंदूरबार जिल्ह्या मध्ये डोंगरदऱ्या, एकजूट समाज आणि आपुलकीची भावना आपल्याला दिसून येते. भिल आणि पवरा जमातींनी अगदी आपुलकी ने त्यांच्या प्राचीन भाषा, पंरपरा आणि हस्तकला पिढ्यान पिढ्या जपल्या आहेत. त्यांच्या शाळा सर्वसाधारणपणे उघड्यावरच असतात, सुविधांच्या अभावामुळे नव्हे तर भुगोलच लोकांचे जीवन, प्रवास आणि शिक्षणाची पध्दती ठरवत असतात.

अनेक विद्यार्थ्यांसाठी शाळेत जाणे म्हणजे एक संकल्प असतो, कारण खूप दूरवर चालावे लागणे, विविध भाषांमधील संभाषण आणि एमेकांची पुस्तके वापरणे ही रोजचीच बाब असते. काही भागात तंत्रज्ञान हे पोहोचू शकत नाही, केवळ कौशल्य किंवा इच्छा नसते असे नव्हे तर नंदुरबार हा जिल्हा वैविध्याने नटलेला असा जिल्हा आहे म्हणून. अशा ठिकाणीच आशा पल्लवीत होत असतात. अरविंद मफतलाल ग्रुप च्या सहकार्याने भविष्यातील के१२ स्टार्टअप असलेल्या गेट सेट लर्न या स्टार्ट अप ने नंदुरबार जिल्ह्यात काम करायला सुरुवात केली. यासाठी एक सोपा विचार होता तो म्हणजे मुले ही केवळ शिक्षण घेणारीच नाहीत तर ते निसर्ग, समाज आणि लवचिकतेने समस्यांचे निराकरण करणारी ठरतील.

अशाच जिल्ह्यातील एका सामाजिक शाळेत विद्यार्थी रोबोटिक किट्स आणि लॅपटॉप्स सह उपकरणांच्या जवळ गोळा होऊन माहिती मिळवण्यास उत्सुक असतात. अनेकांसाठी ही उत्सुकता नसते तर नवीन अनुभव असतो." आम्ही अशा गोष्टी कधीच केलेल्या नाहीत. ही आमच्यासाठी संपूर्ण अशी नवी दुनिया आहे." आपल्या बाकारवरील रोबोची हालचाल पाहून उत्साहाने एका आठवीतल्या मुलाने सांगितले. नंदुरबार सारख्या जिल्ह्यांमध्ये सर्वसाधारणपणे शाळांमधील अंतर, बहुभाषिक वर्ग आणि मोठ्या संख्येच्या विद्यार्थ्यांना सांभाळणारे कमी शिक्षक ज्यांना नवीन तंत्रज्ञाना बद्दल कमी ज्ञान असणे अशा प्रत्यक्ष समस्या असतात. गेट सेट लर्न सध्याच्या पध्दतींना सहकार्य करत कार्यशाळा आणि बुटकॅम्प्सच्या माध्यमातून स्थानिक संदर्भांनुसार शिक्षण देतात. विद्यार्थीआणि शिक्षक हे स्टेम, रोबोटिक्स, एआय आणि कोडिंग हे टप्प्या टप्प्याने तयार केलेल्या डिझाईनच्या माध्यमातून आत्मविश्वासाने शिकत असतात. त्यांच्या सर्वसमावेशक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित करतांना गेट सेट लर्न चे सह संस्थापक आणि सीईओ अमीत झवेरी यांनी सांगितले " नंदुरबार सारख्या ठिकाणी भागीदारी महत्त्वपूर्ण ठरते. आम्ही नेहमीच सरकारी संस्था, जिल्हा प्रशासन आणि संस्थां बरोबर नियमितपणे काम करुन विद्यार्थ्यांना नवीन पिढीतील कौशल्य देण्यास उत्सुक संस्थां बरोबर काम करत असतो. आमचे लक्ष्य अगदी सोपे आहे.

कौशल्यावर आधारीत कार्यक्रम आणि बुटकॅम्प्सची अंमलबजावणी करुन प्रत्येक वर्गात स्टेम, एआय आणि जीवन कौशल्ये उपलब्ध करुन देणे. ज्यावेळी आम्ही एकत्रित पणे असे उपक्रम सुरु करतो त्यावेळी त्यांचा परिणाम हा अधिक खोलवर होऊ एका कार्यशाळे पेक्षा अधिक होत असतो." असे झवेरी यांनी सांगितले.

बुटकॅम्प्स ही पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांना सातत्याने रिफ्रेशर्स सेशन्स, मार्गदर्शन आणि टेक होम रोबोटिक्स किट्स मिळतील. शिक्षकांना तंत्रज्ञानावर आधारीत शिक्षणाचे प्रशिक्षण देऊन रोजचा सराव करण्यास देण्यात येणार असून त्याच बरोबर स्थानिक नेत्यां बरोबर एकत्र येऊन शिक्षकां बरोबर भागीदारी करुन समाजाच्या भल्यासाठी काम केले जाणार आहे. नंदुरबारच्या प्रवासातून अनेक आदिवासी आणि गरीब समाजाला गेट सेट लर्न ला अशी आशा आहे की त्यांचे कार्य अधिक चांगले होईल. जसजशी मुले त्यांचा पहिला रोबो किंवा कोड्स तयार करुन पहिला गेम तयार करतील, तेंव्हा तंत्रज्ञान ही बाहेरची गोष्ट नसेल तर ती त्यांच्या क्षमता आणि कल्पनाशक्तीची एक भरारी असेल जेणेकरुन त्यांची मुळेही सक्षम राहून ते भविष्यातही पुढे जाऊ शकतील.

# २०६० पर्यंत भारतात ८० लाख जीव वाचू शकतात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जागतिक आरोग्य संघटनेच्या सीओपी–११ अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेल्या नवीन अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे की, भारताने विज्ञानाधिष्ठित तंबाखू–हानी कमीकरण धोरणे स्वीकारली तर २०६० पर्यंत तब्बल ऐंशी लाख लोकांचे प्राण वाचू शकतात. जगभरातील तंबाखूसेवनामुळे दरवर्षी कोट्यवधी लोक मृत्यूमुखी पडत असताना, या अहवालात सूचित करण्यात आले आहे की पारंपरिक तंबाखू–नियंत्रण उपायांसोबत आधुनिक, विज्ञानाधारित पर्यायांचा समन्वय साधल्यास २१व्या शतकातील ही आरोग्य–महामारी मोठ्या प्रमाणात रोखता येऊ शकते. सध्या जगभरात १.१ अब्जांहून अधिक लोक धूम्रपान करतात, ज्यामुळे आरोग्यव्यवस्थांवर प्रचंड भार पडत आहे. या नव्या विश्लेषणानुसार, जर धूम्रपान करणाऱ्यांपैकी किमान २० टक्के लोकांनी पुढील दशकभरात कमी जोखमीचे पर्याय स्वीकारले, तसेच उर्वरित लोकांना धूम्रपान सोडण्यासाठी प्रभावी मदत मिळाली, तर जागतिक स्तरावर धूम्रपानामुळे होणारे मृत्यू अर्ध्यावर आणणे शक्य आहे आणि २०६० पर्यंत १० कोटींहून अधिक जीव वाचू शकतात. भारतात प्रौढ धूम्रपानकर्त्यांचे प्रमाण २१.८ टक्क्यांपर्यंत असल्याने, देशावर या संकटाचे ओझे अधिक गंभीर आहे.

# फुले दांपत्य भारतीय स्त्रीवादाचे जनक : संगीता झिंजुरके

## संविधान दिनानिमित्त एक दिवसीय 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' महाकाव्य संमेलनाचे उद्‌घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी महिलांना शिक्षणाची दारे खुली करून स्त्रीजातीचा उद्धार केला. जात-धर्मापलीकडे जाऊन प्रगतीच्या वाटेवर घेऊन जाणारे फुले दाम्पत्य भारतीय स्त्रीवादाची जनक आहेत," असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री संगीता झिंजुरके यांनी केले. विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती, काषाय प्रकाशन आणि बंधुता प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त आयोजित 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' या महाकाव्य संमेलनाच्या उद्‌घाटनावेळी संगीता झिंजुरके




संमेलनाध्यक्ष म्हणून बोलत होत्या. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या या संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ कवियित्री प्रा. डॉ. सविता पाटील यांच्या हस्ते झाले. प्रसंगी विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक बंधुताचार्य प्रकाश रोकडे, प्रसिद्ध कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे, स्वागताध्यक्ष सीमा गांधी, प्रा. भारती जाधव, पौर्णिमा वानखेडे आणि प्रा. सायली गोसावी आदी उपस्थित होते.

संगीता झिंजुरके म्हणाल्या, "सावित्रीबाईंच्या साहित्यामधून स्त्रीच्या उद्धारासाठी फुले दाम्पत्याने केलेले कार्य अधोरेखित होते. त्यांनी दिलेला विचार, संविधानाचे कवच यामुळे आज स्त्रीला स्वाभिमानाने जगण्याची संधी मिळत आहे. अनेक क्षेत्रात ती उंच भरारी घेत आहे. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे. स्त्री ही परिवर्तनाची वाहक असल्याने तिने विवेकी राहत परिवर्तनाचा विचार अंगिकारला पाहिजे. संविधानाच्या मार्गावर चालायला हवे." प्रा. डॉ. सविता पाटील म्हणाल्या, "बाईमाणूस मिळालेल्या संधीचे सोने करत असते. संधी मिळण्यासाठी संघटित असणे महत्त्वाचे आहे. समाजाला एकसंघ ठेवण्यासाठी स्त्रीवादाचा विचार मोलाचा आहे. स्त्री शिकली, तर दोन कुटूंब सुधारत असते.

# संविधानाची मूल्ये, फुले दाम्पत्याचे विचार प्रगल्भ समाजासाठी आवश्यक : डॉ. अश्विनी धोंगडे

## संविधान दिनानिमित्त आयोजित 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' काव्य संमेलनाचा समारोप

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण, साहित्य आणि महिला सक्षमीकरणात अमुल्य योगदान आहे. सावित्रीबाई जोतिबांसाठी प्रेरणास्त्रोत होत्या. पती-पत्नीमध्ये एकत्व असणे आता खूप अवघड आहे. अशा काळात सावित्रीबाई आणि जोतिबा आपल्याला एकत्वाची प्रेरणा देतात.



संविधानाची मूल्ये, फुले दाम्पत्याचे विचार प्रगल्भ समाजासाठी आवश्यक आहेत," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अश्विनी धोंगडे यांनी केले. विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती, काषाय प्रकाशन आणि बंधुता प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त आयोजित 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' महाकाव्य संमेलनाच्या समारोपात डॉ. अश्विनी धोंगडे बोलत होत्या.

नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात आयोजित कार्यक्रमात संमेलनाध्यक्ष संगीता झिंजुरके, स्वागताध्यक्ष सीमा गांधी, संयोजिका प्रा. भारती जाधव, पौर्णिमा वानखेडे, प्रा. सायली गोसावी आदी उपस्थित होते. संमेलनात 'क्रांतीसूर्य सावित्रीज्योति पुरस्कार' बंधुता चळवळीत गेल्या ५१ वर्षांपासून योगदान देणाऱ्या मंदाकिनी आणि बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांना, तर 'ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले ज्ञानसाधना पुरस्कार' रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी येथील कन्या महाविद्यालयास, तसेच 'संविधान सन्मान आदर्श पत्रकारिता पुरस्कार' नम्रता फडणीस (लोकमत), सुवर्णा चव्हाण (पुढारी), कल्पना खरे-साठे (केसरी), मेधा पालकर (सामना), प्रीती पाठक (भास्कर), अर्चना मोरे (पुणे मिरर), चैत्राली देशमुख (सिव्हिक मिरर), शिवानी पांढरे (एबीपी माझा), गजाला सय्यद (शबनम न्यूज), वनिता चौधरी (साहित्यलीला पंढरी) यांना प्रदान करण्यात आला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने प्रा. सुप्रिया बनकर, प्रा. अनुप्रिया प्रभू, प्रा. सीमा ठोंगिरे, प्रा. पूजा जाधव, डॉ. माधुरी देशमुख, डॉ. मोनिका जैन, रोहिणी काकडे, सुषमा कारंडे, डॉ. वैशाली सुपेकर, प्रा. गौरी माळी, प्रा. सुवर्णा यादव व प्रा. पूजा चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला.

# बे दुणे तीन - या मनात आनंदाचे तरंग निर्माण करणाऱ्या मालिकेचा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मराठी ZEE5, मराठी मनोरंजनासाठी अतिशय उत्तम ठिकाण असून दिनांक 5 डिसेंबर 2025 रोजी प्रीमियर होणाऱ्या आगामी ओरिजिनल मालिका बे दुणे तीन चा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. आधुनिक नातेसंबंधांची आनंददायी अनागोंदी आणि मनाला भिडणारे बारकावे यांचे ज्वलंत रूप या आयुष्याचे खरे स्वरूप दाखविणाऱ्या विनोदी नाटकात पहायला मिळणार आहे. बे दुणे तीन मध्ये दीक्षा केतकर, विराजस कुलकर्णी आणि शुभांकर एकबोटे सोबतच क्षितिश दाते, पुष्करराज चिरपुटकर आणि शिवाणी रांगोळे भूमिका साकारत असून हा अभय आणि नेहा या एका अशा तरुण जोडप्याचा प्रवास दाखवितो ज्यांना एक नव्हे,





तर तीन बाळ होणार आहेत, असे कळल्यावर त्यांचे आयुष्य पूर्णपणे पालटते. या मालिकेचे दिग्दर्शन अथर्व सौंदणकर व हिमांशू पिले यांनी केले असून वृषांक प्रॉडक्शन्स यांनी निर्मिती केली आहे. जिव्हाळा, विनोद आणि वास्तववाद एकत्र करणारी एक ताजी, संबंधित कथा या मालिकेतून दिसून येते. बे दुणे तीन मध्ये प्रभावशाली अभिनय आणि मनाला भिडणारी कथा आहे आणि जोडप्यांशी व कुटुंबांशी खोलवर जुळण्याची खात्री देते. सुरुवातीला आश्चर्य आणि अविश्वास दिसतो, पण लगेचच गोंधळ, गैरसमज, आणि नव्याने प्रेम अशा भावनांचा सलग प्रवाह प्रारंभ होतो. भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य अशा तीन एकमेकांत गुंफलेल्या काळांमध्ये या मालिकेचे कथन केले जात आहे आणि वैवाहिक आयुष्यातील बदलत्या परिस्थिती आणि यात जवळ येऊन ठेपलेल्या पालकत्वाचे चित्रण करण्यासाठी फारच कलात्मकरीत्या विनोद, भावना आणि सत्यता एकत्र गुंफल्या गेल्या आहेत. बे दुणे तीन संघर्ष, संबंध आणि स्वतःबाबतच्या जाणीवेतील क्षणांद्वारे आयुष्याचे जोडीदार आणि पालक म्हणून एकत्र पुढे जाण्याच्या गोड-तिखट प्रवासावर सुंदरपणे प्रकाश टाकते.

हेमा व्ही.आर., बिझनेस हेड, मराठी ZEE5, म्हणाल्या, "मराठी ZEE5 येथे आम्हाला अशा कथा तयार करण्यात गर्व आहे ज्या महाराष्ट्रीयन घरांतील मनाला स्पर्श करणाऱ्या गोष्टी दर्शवतात आणि लोकांना हसायला लावतात, विचार करायला लावतात आणि त्यांच्या मनाला खोलवर स्पर्श करून जातात. बे दुणे तीन मध्ये त्या दृष्टीला विस्तारून सांगितले गेले आहे. खऱ्या आयुष्यातील नातेसंबंधांमध्ये आनंद आणि अनागोंदी एकत्र असतात, आणि सर्वात अनपेक्षित परिस्थितींमध्येही प्रेम अधिक खोलवर वाढत असते आणि असेच नातेसंबंधातून या कथेतून दाखविले गेले आहे. अभय आणि नेहाच्या प्रवासाशी आमचे प्रेक्षक त्वरित जोडले जातील, असे आम्ही मानतो. त्यांची कथा पालक बनण्याच्या पलीकडे जाऊन पालकत्वाच्या प्रवासात संगत आणि सहानुभूती नव्याने शोधण्याबद्दल आहे. आम्ही अतिशय आनंदाने आमच्या प्रेक्षकांसाठी बे दुणे तीन दिनांक 5 डिसेंबर रोजी सादर करीत आहोत." वृषांक प्रॉडक्शन्सच्या प्रतिनिधींनी सांगितले, "बे दुणे तीन ची संकल्पना तयार केली आम्ही प्रथम तयार केली तेव्हा आम्हाला प्रेम आणि जबाबदारी यांच्यातील नाजूक अंतर टिपायचे होते, तसेच तो काळ टिपायचा होता जिथे आयुष्यात नात्यातील ताकद पणाला लागली आहे, तरीसुद्धा त्याचा अर्थ अधिक खोलवर रुजलेला आहे. तीन बाळं होणार असे एका जोडप्याला समजल्याची कल्पना आयुष्याच्या अनिश्चिततेला आणि विनोदाला अगदी रूपक बनली. शो चालू असताना आपण पहाल की अगदी खऱ्या नात्यांप्रमाणेच एकाच वेळेस हसणे, निराशा आणि प्रेम एकत्र अनुभवायला मिळू शकतात. हे समप्रमाणात भावनिक, गंमतीशीर आणि प्रामाणिक आहे.

मराठी ZEE5 सोबत या प्रकल्पावर काम करताना एक कल्पक समाधान अनुभवायला मिळाला, आणि आम्ही अतिशय उत्सुकतेने प्रेक्षकांसमोर ही पात्रे आणि त्यांचे अनागोंदी माजलेले, प्रेमाने भरलेले जग प्रस्तुत करण्याची वाट पाहत आहोत."

# स्पेक्टॅक्युलर सौदी' मल्टी-सिटी शोकेस भारतात संपन्न

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, अहमदाबाद आणि हैदराबादमध्ये तीन असाधारण दिवस सांस्कृतिक शोध, सेलिब्रिटींशी संवाद आणि अखंड प्रवास ऑफर दिल्यानंतर, 'स्पेक्टॅक्युलर सौदी' चा समारोप एका उच्च, उत्साही पद्धतीने झाला, ज्यामध्ये २००,००० अभ्यागतांचे स्वागत झाले. सौदीच्या टुरिझम ब्रँड सौदी टुरिझम अथॉरिटीच्या ग्राहक-मुखी ब्रँड 'सौदी', अरेबियामध्ये स्वागत' द्वारे आयोजित या कार्यक्रमाने कला प्रदर्शने, कॉफी आणि खजूर अनुभव, अर्दा नृत्य, अरबी कॅलिग्राफी, समर्पित सादू विणकाम कोपरा, पाककृती अनुभव आणि बरेच काही यासह बहु-संवेदी क्रियाकलापांद्वारे सौदीचा आत्मा, संस्कृती आणि आत्मा एकत्र आणला. शीराज टूर्स, ॲटलस ट्रॅव्हल्स, यात्रा, फ्लिपकार्ट + क्लिअरट्रिप, अकबर हॉलिडेज आणि मेक माय ट्रिप सारख्या प्रमुख व्यापारी भागीदारांसह, ऑन-ग्राउंड ट्रॅव्हल एंगेजमेंटला आणखी समृद्ध करते, शोकेसचे तल्लीन करणारे वातावरण वाढवते.